रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २७९
www.ramprahar.com

◆ मंगळवार, २८ एप्रिल २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

ग्रामपंचायत पोटनिवडणुकीसाठी आज संबंधित क्षेत्रात सुट्टी/२

पालीमध्ये प्रशासनाने कचरा वर्गीकरण करण्याची मागणी/५

अखिल भारतीय पुरुष गट कबड्डी स्पर्धा आजपासून/८

## उष्णतेचा कहर सुरूच! शेतकरी महिलेचा उष्माघाताने मृत्यू

**जुन्नर** : सध्या सर्वत्र उन्हाचा कडाका प्रचंड वाढला असून या वाढत्या उष्णतेचा एक भीषण बळी



निमगाव सावा येथे गेला आहे. शेतात काम करत असताना अचानक उष्माघाताचा त्रास झाल्याने रूपाली भाऊ गाडगे (वय अंदाजे ४०) या महिला शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार निमगाव सावा येथील गावमाळा/माडीमळा परिसरातील रहिवासी असलेल्या रूपाली गाडगे या सोमवारी (दि. २७) आपल्या शेतात खुरपणीचे काम करत होत्या. सकाळी ११.४५च्या सुमारास उन्हाची तीव्रता अधिक असताना त्यांना अचानक अस्वस्थ वाटू लागले. उष्माघाताचा तीव्र झटका बसल्याने त्या जागीच कोसळल्या. तातडीने मदत मिळेपर्यंत त्यांची प्राणज्योत मालवली होती. दरम्यान, राज्यात उष्माघातामुळे आतापर्यंत सुमारे १० जण दगावले असल्याचे चित्र आहे.

# महाचतुर एआय चॅटबॉट परिवर्तनकारी उपक्रम

### कौशल्य प्रशिक्षण, रोजगार, उद्योजकता आणि मार्गदर्शन एकाच व्यासपीठावर -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील युवकांना कौशल्य प्रशिक्षण, रोजगार, उद्योजकता आणि मार्गदर्शन एकाच व्यासपीठावर उपलब्ध करून देणारा 'महाचतुर एआय चॅटबॉट' हा महाराष्ट्रासाठी परिवर्तनकारी उपक्रम आहे. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या पुढाकारातून विकसित करण्यात आलेला हा चॅटबॉट देशातील राज्य शासनाने तयार केलेला अशा प्रकारचा पहिलाच अभिनव उपक्रम आहे. या चॅटबॉटमुळे युवा वर्गाचा शिक्षण ते रोजगार हा प्रवास अधिक सुकर होईल आणि उद्योगांना कुशल



मनुष्यबळ त्वरित उपलब्ध होईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

सह्याद्री अतिथीगृह येथे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे 'चॅटबॉट' लोकार्पण व सामंजस्य करार पार पडले. त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा, अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा, राज्य नाविन्यता सोसायटीचे आयुक्त डॉ.अमित सैनी, व्यवसाय व प्रशिक्षण संचालनालयाचे संचालक सतीश सूर्यवंशी, जपानचे वाणिज्यदूत हितोमि साटो, जर्मनीचे वाणिज्य दूत क्रिस्टोफ हेलिअर, कोरियाचे वाणिज्य दूत यो डॉवॉन, फिनलँडचे वाणिज्य दूत इरिक एफ हॉलस्ट्रॉम तसेच विविध उद्योग व शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी, आंतरराष्ट्रीय भागीदार उपस्थित होते.


मुख्यमंत्री म्हणाले, भारताची ६५ टक्के लोकसंख्या ३५ वर्षांखालील असून ही डेमोग्राफिक ॲडव्हांटेज देशाच्या विकासासाठी मोठी संधी आहे. या युवाशक्तीला कौशल्य प्रशिक्षण देऊन अर्थव्यवस्थेच्या मुख्य प्रवाहात आणणे आवश्यक असून त्यासाठी केंद्र व राज्य शासनाने कौशल्य विकासाला प्राधान्य दिले आहे. महाराष्ट्रातही कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग प्रभावीपणे काम करत असून उद्योगांच्या गरजांनुसार प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करण्यावर भर दिला जात आहे. उद्योगांना प्रशिक्षित मनुष्यबळ आणि तरुणांना रोजगार हवा आहे. या दोघांमध्ये प्रभावी दुवा निर्माण करण्याचे काम 'महाचतुर चॅटबॉट' करणार आहे. एआय आधारित 'चॅटबॉट' कौशल्य प्रशिक्षण, रोजगार संधी, उद्योजकता मार्गदर्शन, अर्ज प्रक्रिया, असेसमेंट आणि मार्केट लिंकेज अशा सर्व सेवा वन-स्टॉप सोल्युशन म्हणून उपलब्ध करून देणार आहे.

## जेएनपीए बंदरात चिनी बनावटीचे फटाके जप्त; दोन जणांना अटक

**उरण : प्रतिनिधी**

जेएनपीए बंदरात तस्करीच्या मार्गाने आयात करण्यात आलेले प्रतिबंधित चार कंटेनरमधून १७.०७ कोटी रुपये किमतीचे ७० मेट्रिक टन चिनी बनावटीचे फटाके जप्त करण्यात आले आहेत. मुंबई डीआरआयच्या अधिकाऱ्यांनी पायरो हाईस्ट नावाच्या मोहिमेंतर्गत ही कारवाई केली असून या प्रकरणी दोन आरोपींना अटक केली आहे. सीमाशुल्क तपासणी टाळण्यासाठी हा माल बनावट वस्तूंच्या नावाने घोषित करण्यात आला होता.

चीनमधून आयात करण्यात आलेले फटाके आरोपींनी कंटेनरचे सील तोडून कंटेनर



फ्रेट स्टेशनवर (सीएफएस) दुसऱ्या वाहनात हलवण्याचा प्रयत्न केला होता. डीआरआय अधिकाऱ्यांनी त्यांना हस्तांतरणा दरम्यान पकडले. तपासात असे निदर्शनास आले की, या टोळीने सीएफएसमध्ये प्रतिबंधित माल काढून टाकण्याची आणि तो परत ठेवण्याची योजना आखली होती.

अटक करण्यात आलेले दोन व्यक्ती अडवण्याच्या वेळी कंटेनरच्या सीलमध्ये छेडछाड करत असल्याचे आढळले. पायरो हाईस्ट नावाची ही कारवाई डीआरआयला मिळालेल्या विशिष्ट गुप्त माहितीवर आधारित होती.

विदेशी व्यापार धोरणांतर्गत फटाक्यांच्या आयातीवर निर्बंध आहेत आणि स्फोटक नियम २००८ नुसार पेट्रोलियम आणि स्फोटक सुरक्षा संघटनेकडून परवाना घेणे आवश्यक आहे. डीआरआयने म्हटले आहे की, अशा सामग्रीच्या अवैध आयातीमुळे सार्वजनिक सुरक्षा, बंदराच्या पायाभूत सुविधा आणि पुरवठा साखळीला धोका निर्माण होतो. या तस्करी नेटवर्कच्या इतर सदस्यांना ओळखण्यासाठी पुढील चौकशी सुरू आहे.

## नारीशक्ती सक्षमीकरणाला भाजपचे प्राधान्य

### महिला मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांचा निर्धार; विरोधकांवर शरसंधान



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नारीशक्ती विधेयकाबाबत घडलेल्या घडामोडींवर भाष्य करण्यासाठी पनवेल शहरातील भाजप मध्यवर्ती कार्यालयात महिला मोर्चाच्या वतीने सोमवारी (दि.२७) पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. महिला सक्षमीकरणाला भाजपचे प्राधान्य असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

पत्रकार परिषदेला महिला मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्ष वर्षा भोसले, भाजप उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, उपमहापौर प्रमिला पाटील, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष प्रिया मुकादम, पनवेल महापालिकेच्या महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे यांची प्रमुख उपस्थिती होती. १६ एप्रिल हा नारीशक्ती विधेयकाचा दिवस देशाच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी नोंदला गेला असता, मात्र विरोधकांनी या विधेयकाला विरोध केल्यामुळे ते मंजूर होऊ शकले नाही, अशी टीका त्यांनी केली.

काँग्रेस पक्षाने नेहमीच महिला आरक्षणाला अडथळा निर्माण करण्याचे काम केले असून महिलांच्या सशक्तीकरणाबाबत त्यांची भूमिका दुटप्पी असल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला.

## खोपोलीतील 'उबाठा' कार्यकर्ते भाजपमध्ये

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत प्रवेश

**खोपोली : प्रतिनिधी**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खोपोली शहर संघटक दिलीप पुरी यांचे पुत्र आमिष पुरी आणि त्यांच्यासोबत यश कळमकर यांनी नुकताच भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. भाजप प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांनी त्यांचे स्वागत केले.





पनवेल येथील भाजप मध्यवर्ती कार्यालयात झालेल्या या पक्षप्रवेश कार्यक्रमास आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, पनवेलचे महापौर नितीन पाटील, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, खोपोलीचे उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, ज्येष्ठ उद्योजक यशवंत साबळे, पनवेल पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, कर्जत विधानसभा उपाध्यक्ष राजेश भगत, सदस्य संजय तन्ना, खोपोली मंडळ अध्यक्ष अजय इंगुळकर यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

येणाऱ्या काळात पक्षाची विचारधारा खोपोलीतील घरोघरी पोहचवून पक्ष संघटन अजून मजबूत करण्याची ग्वाही आमिष पुरी यांनी यावेळी दिली.

## निवडक

### 'आप'चे सात खासदार अधिकृतपणे भाजपत विलीन

**नवी दिल्ली** : राज्यसभा सभापती सी.पी. राधाकृष्णन यांनी सोमवारी (दि.२७) आम आदमी पक्षाच्या सात खासदारांचे भाजपमधील विलीनीकरण अधिकृतपणे स्वीकारले. यामुळे संसदेचे वरिष्ठ सभागृह राज्यसभेत अरविंद केजरीवाल यांच्या पक्षाचे संख्याबळ घटून तीनवर आले, तर भाजपचे संख्याबळ वाढून ११३ झाले आहे. 'आप'ला सोडचिठ्ठी देत भाजपमध्ये दाखल झालेल्या खासदारांमध्ये राघव चढ्ढा, अशोक मित्तल, हरभजन सिंग, संदीप पाठक, विक्रमजित साहनी, स्वाती मालीवाल आणि राजिंदर गुप्ता यांचा समावेश आहे.

### मुंबईच्या मरीन ड्राईव्ह मार्गावर भीषण अपघात; तिघांचा मृत्यू

**मुंबई** : येथील मरीन ड्राईव्ह मार्गावर सोमवारी (दि.२७) पहाटे भीषण अपघात झाला. या अपघातात तिघांचा मृत्यू ओढावला. उपलब्ध माहितीनुसार मृतांमध्ये एक ज्येष्ठ नागरिक, तर तरुण आणि तरुणी यांचा समावेश असल्याची माहिती पोलिसांची दिली. ज्येष्ठ नागरिक मॉर्निंग वॉकसाठी आले असता अतिशय वेगात आलेल्या एका दुचाकीने त्यांना आणि इतर स्कूटरनाही धडक दिली. यामध्ये तिघांचा मृत्यू झाला.

## 'लोकनेता : एक युगपुरुष' वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

### रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये विद्यार्थ्यांनी उलगडला जीवनप्रवास



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये रविवारी वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात आणि दिमाखात पार पडले. या कार्यक्रमाचा मुख्य विषय 'लोकनेता : एक युगपुरुष' असा होता. विद्यार्थ्यांनी संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या प्रेरणादायी जीवनप्रवासाचे प्रभावी सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.

या कार्यक्रमाला लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, महापौर नितीन पाटील, संचालक तथा नगरसेवक परेश ठाकूर, सदस्य राहुल घरत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, नगरसेवक प्रवीण पाटील, प्रभाकर जोशी, नगरसेविका परेशा पटेल, अनिता पाटील, सोनाली नवघरे, उषा अडसूळ, प्रतिभा भोईर, दर्शना भोईर, माजी पं.स. सदस्य रत्नप्रभा घरत, शाळेच्या मुख्याध्यापिका राज अलोनी यांच्यासह पालक, विद्यार्थी उपस्थित होते. नाटक, नृत्य आणि विविध कलाप्रकारांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या संघर्षमय प्रवासापासून ते यशशिखरापर्यंतचा प्रवास जिवंत केला.

कार्यक्रमाचे स्वागतपर भाषण अपूर्व ठाकूर यांनी प्रभावीपणे केले, तर सूत्रसंचालन आदित्य ठाकूर यांनी समर्थपणे पार पाडले. यावेळी दहावी बोर्ड परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पहिल्या पाच विद्यार्थ्यांना रोख रक्कम व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. प्रथम क्रमांक पटकावलेल्या अनन्या भुतडा हिला २५ हजार रुपये, तर इतर चार विद्यार्थ्यांना प्रत्येकी १० हजार रुपये देण्यात आले तसेच बारावी उत्तीर्ण होऊन आयआयटी, एमबीबीएसमध्ये प्रवेश मिळवलेल्या आणि राष्ट्रीय स्तरावर प्रावीण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचाही गौरव करण्यात आला.

## मुंबईत एकाच कुटुंबातील चौघांचा मृत्यू; विषबाधेची शक्यता

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईच्या पायधुनी परिसरात एकाच कुटुंबातील चौघांचा मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे. या कुटुंबाने बिर्याणीनंतर कलिंगड खाल्ले होते. अन्नातून विषबाधा झाल्याने ही घटना घडल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून नेमक्या कोणत्या पदार्थामुळे विषबाधा झाली याचा तपास पोलीस करत आहेत.

अब्दुल्ला डोकाडिया (४०), नसरीन डोकाडिया (३५), आयेशा (१६) आणि झैनब (१३) अशी मृतांची नावे आहेत. मुंबई पोलिसांच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार या २५ एप्रिल रोजी कुटुंबाची प्रकृती बिघडल्यानंतर त्यांना तातडीने जे.जे. रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, मात्र उपचारादरम्यान या चौघांचाही दुसऱ्या दिवशी मृत्यू झाला. सकाळी १०.१५ वाजता जैनब हिचा मृत्यू झाला. त्यानंतर नसरीन आणि आयशाचा मृत्यू झाला. रात्री १०.३० वाजता अब्दुल्ला यांचाही मृत्यू झाला. त्यामुळे खळबळ उडाली.

या घटनेची गांभीर्याने दखल घेत जे.जे. मार्ग पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. पोलिसांना दिलेल्या जबाबात कुटुंबातील एका सदस्याने नमूद केले होते की, मृत्यूपूर्वी त्यांनी रात्री बिर्याणी खाल्ली आणि त्यानंतर कलिंगड खाल्ले होते, तर शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यानंतरच मृत्यूचे नेमके तांत्रिक कारण स्पष्ट होईल, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

अन्न नमुने तपासणीसाठी पाठवण्यात आले असून रात्रीच्या जेवणामुळे विषबाधा झाली की त्यानंतर खाल्लेल्या कलिंगडामुळे हा प्रकार घडला? याचा तपास पोलीस करीत आहेत.

## एमएनएम विद्यालयाला आयएसओ प्रमाणपत्र प्राप्त



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील अग्रगण्य शिक्षण संस्था असलेल्या जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था संचलित मोरू नारायण म्हात्रे (एमएनएम) विद्यालय आणि तुकाराम नारायण घरत कनिष्ठ महाविद्यालय गव्हाण, पनवेल या शाळेला आयएसओ ९००१ : २०१५ प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.

या बहुमानामुळे विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेवर जागतिक स्तरावरील मान्यतेची मोहोर उमटली असून संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शाळेचे विशेष कौतुक करीत प्रगतीत सातत्य ठेवा, अशा शुभेच्छा दिल्या.


राज्य शासनाच्या शिक्षण विभागाच्या निकषांनुसार एमएनएम विद्यालयाने पायाभूत स्तरापासून ते उच्च माध्यमिक स्तरापर्यंत मूल्य-आधारित आणि कौशल्य-केंद्रित अध्यापनात सातत्य राखले आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास तसेच शिक्षणावर लक्ष केंद्रित करून उच्च दर्जाच्या शैक्षणिक सेवा प्रदान केल्याबद्दल शाळेला गुणवत्ता व्यवस्थापन प्रणाली या संस्थेमार्फत आयएसओ ९००१ : २०१५ प्रमाणपत्र बहाल करण्यात आले आहे.

याबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह संस्थेचे सचिव डॉ.एस.टी. गडदे, सदस्य ॲड. राहुल घरत, शाळेचे चेअरमन भार्गव ठाकूर यांनी शाळेच्या प्राचार्य सायली वडवलकर, पर्यवेक्षिक प्रणिता गोळे, अरुण जोशी तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे अभिनंदन केले.

## गव्हाण ग्रामपंचायत ग्रामस्वच्छता मोहिमेची आज नियोजन बैठक

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

थोर समाजसुधारक स्व. जनार्दन भगत यांच्या ३८व्या पुण्यतिथीनिमित्त



गव्हाण ग्रामपंचायत क्षेत्रात ग्रामस्वच्छता मोहिमेचे आयोजन १ ते ४ मेदरम्यान करण्यात आले आहे. या मोहिमेच्या पूर्वतयारीसाठी मंगळवारी (दि.२८) सायंकाळी ७ वाजता उलवे नोड सेक्टर १२ येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये नियोजन बैठक आयोजित करण्यात आली आहे.

या बैठकीला सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते व विद्यमान नगरसेवक तथा गव्हाण ग्रामपंचायत ग्रामस्वच्छता मोहिमेचे प्रमुख परेश ठाकूर यांनी केले आहे.



## आमदार महेश बालदी यांच्या निधीतून दापोलीत रस्ता काँक्रीटीकरण

### भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील दापोली हनुमानपाडा येथे आमदार महेश बालदी यांच्या स्थानिक निधीतून साकारण्यात येणाऱ्या रस्त्याच्या काँक्रीटीकरण कामाचे भूमिपूजन सोमवारी (दि.२७) भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आले. सुमारे १० लाख रुपये खर्चून हा रस्ता तयार करण्यात येणार असून यामुळे स्थानिक नागरिकांची चांगली सोय होणार आहे.

या कार्यक्रमाला पंचायत समिती सभापती रंजना वास्कर, माजी सभापती प्रकाशशेठ जितेकर, जिल्हा परिषद सदस्य सोनाली जितेकर, माजी सरपंच सुभाषशेठ म्हात्रे, माजी उपसरपंच गजानन पाटील, विद्यमान सरपंच समाधान खोपकर, सदस्य जयवंत गीतेकर यांच्यासह मिथुन जितेकर, अरुण कुडावकर, राजा पाटील, बबन म्हात्रे, संदीप कुडावकर, सुजाता म्हात्रे, कविता पाटील, धनश्री पाटील, प्रफुल जितेकर आदी उपस्थित होते. (पान २ वर..)

# खालापुरात गोमाता दिनानिमित्त भव्य रॅली

## तहसील कार्यालयात निवेदन सादर



**खालापूर : रामप्रहर वृत्त**

२७ एप्रिल 'गोमाता दिन' निमित्त खालापूर फाटा येथे गोप्रेमींनी एकत्र येत घोषणाबाजी करत जनजागृती केली. यानंतर उपस्थितांनी गोमातेच्या सन्मानार्थ गाय व वासराच्या मूर्तीला पुष्पहार अर्पण करून आपली श्रद्धा व्यक्त केली.

या कार्यक्रमानंतर सर्वांनी खालापूर फाटा येथून खालापूर तहसील कार्यालयापर्यंत रॅली काढत शांततेत मोर्चा काढला. "गोसेवा, गोरक्षण आणि गोमाता सन्मान" या प्रमुख मागण्यांसह सहभागी नागरिकांनी विविध घोषणा देत आपला आवाज बुलंद केला. तहसील कार्यालयात पोहचल्यानंतर प्रतिनिधीमंडळाने तहसीलदार अभय चव्हाण यांना निवेदन सादर केले.

या निवेदनाद्वारे केंद्र व राज्य सरकारने गायींचे संरक्षण, संवर्धन आणि सन्मान यासाठी ठोस पावले उचलावीत, अशी मागणी करण्यात आली. सादर करण्यात आलेल्या निवेदनात गायीला राष्ट्रीय माता म्हणून दर्जा देणे, गोहत्या पूर्णपणे बंद करणे, गोशाळांना अनुदान देणे तसेच शेण व गोमूत्रावर आधारित सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देणे अशा विविध मागण्यांचा समावेश होता.

यावेळी आयोजकांनी सांगितले की, गोमाता ही भारतीय संस्कृतीचा अविभाज्य भाग असून तिचे संरक्षण करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. आजच्या बदलत्या जीवनशैलीत सेंद्रिय शेती, नैसर्गिक उत्पादने आणि पर्यावरणपूरक उपक्रमांची गरज अधिक वाढली असून गोसंवर्धन यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावू शकते. मोर्चादरम्यान शिस्तबद्ध पद्धतीने सहभाग घेत नागरिकांनी शांततेचा संदेश दिला. कोणतीही अनुचित घटना घडू न देता हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. स्थानिक प्रशासनानेही या उपक्रमाची दखल घेत निवेदन स्वीकारले.

कार्यक्रमात विविध सामाजिक कार्यकर्ते, गोप्रेमी, युवक व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सर्वांनी एकत्र येत गोसेवा आणि गोरक्षणाबाबत जनजागृती करण्याचा निर्धार व्यक्त केला. एकंदरीत, 'गोमाता दिन' निमित्त खालापूर येथे पार पडलेला हा उपक्रम शांततामय मार्गाने आपल्या मागण्या मांडणारा आणि समाजात जागृती निर्माण करणारा ठरला.

यावेळी रोहित कुळकर्णी, भावेश लोखंडे, कौस्तुभ देशक, विलास बारस्कर, रवींद्र जैन, गणेश मोरे, पंकज जाधव, प्रशांत लटके, ललीत दुबे, रितेश शेलार, आनील सावंत, संतोष टेमकर, विनीत मोडक, प्रशांत जुबरे, रोहित गिरी, अशोक घोसाळकर, संतोष मालुसरे, अभिषेक फराट, विनोद बारगजे, प्रतीक पाठक, जयवंत पाटील, संतोष परदेसी, जयश्री घोडविंदे, विभा पाठक, श्रुती चौधरी तसेच साधुसंत नंदा नंदगिरी महाराज महा मंडलेश्वर, किंनर आखाडा श्री स्वामी रमेश नित्यानंद जी, ह.भ.प.चैतन्य महाराज खंडागळे, ह.भ.प. वामन महाराज भोईर, ह.भ.प. रामचंद्र मिसाळ महाराज, ह.भ.प. पांगारे महाराज, ह.भ.प. दगडू मिसाळ महाराज, ह.भ.प. दिनेश मते महाराज, ह.भ.प.दत्ताबुवा चाळके, विठ्ठल मोरे, मनीष खवळे, सुप्रिया साळुंखे, मिलिंद पाटील, मंगेश चाळके, उमेश पडवकर, आदी गो माता सेवक, सकळ हिंदु समाज उपस्थित राहिले.

# रोह्यात गो-हत्येविरोधात तहसीलदारांना निवेदन



**रोहा : प्रतिनिधी**

रोहा शहरात सकल हिंदू समाजाच्या वतीने गो हत्ये विरोधात तहसीलदार किशोर देशमुख यांना निवेदन देण्यात आले.

महंत रामकृष्ण अयोध्या संस्थापक व अध्यक्ष श्री रामानंद वैष्णव गुरुकुलम अयोध्याचे आचार्य श्री सत्यनारायण दास जी महाराज यांनी दुपारी ११.३०च्या सुमारास रोहा शहरातील राम मंदिर व हनुमान मंदिर येथे जाऊन दर्शन घेत सकल हिंदू समाजाच्या कार्यकर्त्यांसह मुख्य बाजारपेठेतुन तीन पत्ती नाकापर्यंत चालत गेले.

तहसीलदार कार्यालयात आचार्य श्री सत्यनारायण दास जी महाराज यांच्या हस्ते तहसीलदार किशोर देशमुख यांना निवेदन देण्यात आले असून यावेळी अप्पा देशमुख, तुषार मोरे, दशरथ साळवी, विजय बोरकर, महेश ठाकूर, अशोक निकम, राजेश काफरे, शैलेश रावकर, प्रशांत देशमुख, सुमित रिजबुड, आशिष स्वामी, राकेश महामुनी, विशाल शेलार, यज्ञेश भांड, भारत वाकचौरे आदी सह स्वयंसेवक व कार्यकर्ते उपस्थित होते.

# मुरूड तालुक्यातही गो-प्रेमी आणि हिंदू बांधवांकडून रॅली



**मुरूड : प्रतिनिधी**

राष्ट्रांतील सर्व साधु संतांच्या मार्गदर्शनाखाली चालु असलेल्या संपुर्ण भारतात गो सन्मान आव्हान अभियानाचे औचित्य साधून मुरूड तालुक्यातील गोरक्षक, गो–प्रेमी आणि हिंदू बांधव यांनी आज मुरूड शहरातील समुद्रकिनारा जवळील विश्राम बागपासुन ते तहसिलदार कार्यालय पर्यंत गाय मातेला सन्मान मिळावा या करिता तरुण तरुणी हातात भगवे झेंडे घेऊन पायी रॅली काढण्यात आली.

तहसीलदार कार्यालयातील तहसीलदार दालनात तालुक्यातील गोरक्षक, गो–प्रेमी आणि हिंदू बांधव यांनी आज देशाचे राष्ट्रपती, पंतप्रधान, राज्यपाल व महाराष्ट्र सरकाराला निवेदनाची प्रत तहसीलदार आदेश डफळ व मुरूड पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांना देण्यात आली. आज भारतात ५००० हजार तहसीलदारांना एकाच वेळी निवेदन देण्यात आले.

केंद्र सरकार आणि देशातील सर्व राज्य सरकारांनी गौमातेला राष्ट्रमाता घोषित कराः गाय ही आपली संस्कृती आणि परंपरेचे प्रतीक आहे. तिला 'राष्ट्रमाता' असा सन्मानजनक दर्जा मिळावा., कठोर कायदा गोवंश संरक्षणासाठी आणि गोहत्या रोखण्यासाठी संपूर्ण भारतभर समान आणि कठोर केंद्रीय कायदा लागू करावा. गौ संरक्षणः भटक्या गोवंशाच्या संरक्षणासाठी आणि त्यांच्या निवाऱ्यासाठी ठोस उपाययोजना करण्यात याव्यात. गायीला योग्य अनुदान मिळावे.भारतातुन गोहत्या पुर्णपणे नष्ट करावी.

"गौ. सन्मान आव्हान अभियान" हे एक जनजागृती अभियान आहे ज्याचा उद्देश गायींचा सन्मान, संरक्षण आणि संवर्धन करणे हा आहे. भारतीय संस्कृतीत गायीला विशेष स्थान आहे, त्यामुळे तिच्या आरोग्याची, देखभालीची आणि सुरक्षिततेची जबाबदारी समाजाने सामूहिकपणे घ्यावी.

गायींचे संरक्षण रस्त्यावर भटकणाऱ्या गायींची काळजी घेणे आणि त्यांना सुरक्षित ठिकाणी ठेवणे, हा या अभियानाचा मुख्य संदेश आहे.

# गो–मातेला राष्ट्रमातेचा दर्जा देण्याची मागणी

**कर्जत : प्रतिनिधी**

आज गो सन्मान दिवसाचे औचित्य साधून गो मातेला राष्ट्रमातेचा दर्जा प्राप्त व्हावा. यासाठी कर्जत शहरातून मोर्चा काढून तहसीलदारांच्या माध्यमातून राष्ट्रपती, पंतप्रधान , राज्यपाल, मुख्यमंत्री यांना आज निवेदन देण्यात आले.

कर्जत शहरातून गोमातेला सन्मान द्या. तीला राष्ट्रमातेचा दर्जा द्या. यासाठी मोर्चा काढण्यात आला. ह.भ.प. दिलीप महाराज राणे, ह.भ.प. दीपक महाराज जगताप, ह.भ.प. रमेश महाराज श्रीखंडे, मैत्रेय जीव जी, ह भ प निवृत्ति महाराज शिंदे, दिपक गायकवाड, किरण ठाकरे, साईनाथ श्रीखंडे, विशाल जोशी, दीपक बेहेरे, दिनेश रणदिवे, अमोल ओसवाल, मयुरेश चौधरी, अनंत हजारे, सचिन ठाकूर, हर्षल पारखी, महेश निघोजकर, राज गोडबोले, अमोघ काळे, सुनील हरपुडे, अनुराधा गोखले, मनीषा ढूमने, अमोल सूर्यवंशी, विकास चित्ते, शाम कडव,




दिनेश कडू, सचिन ओसवाल, रत्नाकर बडेकर, अनिल पिंपरकर, यतिन भोसले, अतुल बडगुजर आदी उपस्थित होते.

प्रशासकीय भवनामध्ये मोर्चा आल्यानंतर शिष्ठ मंडळाने तहसीलदार डॉ. धनंजय जाधव यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले व हे निवेदन तुमच्या माध्यमातून राष्ट्रपती, पंतप्रधान, राज्यपाल, मुख्यमंत्री यांना पाठवावे. अशी विनंती केली. त्यानंतर प्रास्ताविकात विशाल जोशी यांनी आजचे निवेदन का देण्यात येत आहे? याची माहिती दिली.

गोमातेला राष्ट्रीय पशु चा दर्जा मिळत नाही तोंपर्यंत तिची होणारी अवैध कत्तल थांबणार नाही, असे स्पष्ट केले. साईनाथ श्रीखंडे यांनी गो मातेचे महत्व व गो रक्षणाची गरज अधोरेखीत करताना संतांनी गो मातेचे धार्मिक व शास्त्रीय महत्वाची लोकांना जाणीव करून दिली आहे. त्यामुळे तीचे रक्षण करणे आपले कर्तव्य आहे, असे सूचित केले.

# महाड येथे गुरुवारी रोजगार मेळावा

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,रायगड–अलिबाग आणि वीर मुरारबाजी देशपांडे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, महाड, यांच्या संयुक्त विद्यमाने ३० एप्रिल २०२६ रोजी वीर मुरारबाजी देशपांडे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, महाड ता.महाड येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता मागदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त अ.मु.पवार यांनी दिली आहे.

जिल्ह्यातील नामांकीत आस्थापनांकडील रिक्तपदांच्या/अॅप्रेंटिसशिपची भरतीसाठी रोजगार मेळावा आयोजित केला आहे. या मेळाव्यात एस.एस.सी./एच.एस.सी, आय.टी.आय., डिप्लोमा इंजिनियर, पदवी इंजिनियर, व इतर पदवीधारक नोकरी इच्छूक उमेदवारांची प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे निवड केली जाणार आहे. ऑनलाईन पध्दीतीने अर्ज करता येईल. प्रथम https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेत स्थळावरील Employment- Job Seeker (Find A Job)- Job Seeker Login या क्रमाने जाऊन आपल्या कडील युजर आयडी व पासवर्ड वापरुन आपली शैक्षणिक माहीती अद्ययावत करून त्यातील Pandit Dindayal Upadhyay Job Fair या ऑप्शनमधून आपला जिल्हा निवडून जिल्ह्याच्या नावावरील Vacancy Listing-I Agree व दिसणाऱ्या विविध पदाना आपल्या शैक्षणिक अर्हते प्रमाणे ऑनलाईन अप्लाय करावे.

रोजगार मेळाव्यातील रिक्तपदांची माहिती https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. जास्तीत–जास्त बेरोजगार उमेदवारांनी यारोजगार मेळाव्याचा लाभ घ्यावा. ०२१४१–२२२०२९ व या कार्यालयाचे लिपिक टंकलेखक म.भा.वखरे,यांच्या ९४२१६१३७५७ या भ्रमध्वनी वर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# चिपळूणसाठी अनारक्षित उन्हाळी विशेष रेल्वेसेवा चालवणार

**रोहा : प्रतिनिधी**

प्रवाशांच्या मागणीनुसार रेल्वे आठवड्याच्या शेवटी (शुक्रवार, शनिवार आणि रविवार) चिपळूण (कोकण विभाग) साठी ३६ अनारक्षित उन्हाळी विशेष रेल्वे सेवा चालवणार आहे.

दिवा चिपळूण–दिवा मेमू (MEMU) त्रै–साप्ताहिक अनारक्षित विशेष (३६ सेवा), गाडी क्रमांक ०११५९ मेमू त्रै–साप्ताहिक अनारक्षित विशेष गाडी दिनांक ०१.०५.२०२६ ते दिनांक ०७.०६.२०२६ पर्यंत दर शुक्रवार, शनिवार आणि रविवारी दिवा येथून रात्री २३.२५ वाजता सुटेल आणि चिपळूण येथे दुसऱ्या दिवशी सकाळी ०६.३० वाजता पोहोचेल. (१८ सेवा). गाडी क्रमांक ०११६० मेमू त्रै–साप्ताहिक अनारक्षित विशेष गाडी दिनांक ०१.०५.२०२६ ते दिनांक ०७.०६.२०२६ पर्यंत दर शुक्रवार, शनिवार आणि रविवारी चिपळूण येथून १५.३० वाजता सुटेल आणि दिवा येथे त्याच दिवशी २३.१० वाजता पोहचेल. (१८ सेवा)

या गाडीला निळजे, तळोजा पांचनंद, कळंबोली, पनवेल, सोमाटणे, आपटा, जिते, पेण, कासू, नागोठणे, रोहा, कोलाड, इंदापूर, माणगाव, गोरेगाव रोड, वीर, सापे वामणे, करंजाडी, विन्हेरे, दिवाणखवटी, कळंबणी बुद्रुक, खेड आणि आंजणी हे थांबे देण्यात आले आहेत. सविस्तर वेळापत्रकासाठी, कृपया www.enquiry.indianrail.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या किंवा NTES अॅप डाउनलोड करा, असे आवाहन मध्य रेल्वे प्रशासनाने केले आहे.

# डॉ. महामुणकर यांची नियुक्ती



**माणगाव : बातमीदार**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी डॉ. गीतांजली समीर महामुणकर यांची प्रभारी परीक्षा नियंत्रक म्हणून नियुक्ती केली आहे.

डॉ. महामुणकर या विद्यापीठातील संगणक अभियांत्रिकी विभागात वर्ष २००५ पासून कार्यरत आहेत. त्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयांमध्ये पी.एच.डी. संपादन केली असून, भूस्थानिक तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता या क्षेत्रांत त्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर मोलाचे संशोधन केले आहे. विद्यापीठाच्या कुलगुरूंनी नियुक्ती पत्राचे औपचारिक प्रदान करून डॉ. महामुणकर यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी विद्यापीठाचे वरिष्ठ प्राध्यापक व प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

# ग्रामपंचायत पोटनिवडणुकीसाठी आज सुट्टी

**रायगड** : रायगड जिल्ह्यातील विविध ग्रामपंचायतींमधील रिक्त झालेल्या पदांसाठी होणाऱ्या पोटनिवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संबंधित कार्यक्षेत्रात २८ एप्रिल २०२६ रोजी स्थानिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे असून जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी याबाबत आदेश जारी केला आहे.

२८ एप्रिल रोजी मतदान, तर दि. २९ एप्रिल रोजी मतमोजणी होणार आहे.

अलिबाग तालुक्यातील बैजाळी, नागाव, खंडाळे, मुरुड एकदरा, काशिद, मांडला, कर्जत पाली तर्फे कोतल खलाटी, खालापूर होराळे, माणगाव वणी मलईकोंड, रोहा पुई, महाड मोहोप्रे, ताम्हाणे, वराठी, पोलादपूर महालगुर, तुर्भे बुद्रुक, म्हसळा घोणसे, आणि श्रीवर्धन दिवेआगर, बागमांडला आदी ग्रामपंचायतींचा समावेश आहे. एकूण १८ ग्रामपंचायतींमध्ये पोटनिवडणुका होणार आहेत.


पान १ वरुन

## आमदार महेश बालदी यांच्या निधीतून दापोलीत रस्ता काँक्रीटीकरण



यावेळी बोलताना अरुणशेठ भगत यांनी सांगितले की, पनवेल आणि उरण तालुक्यात आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात विकासकामे सुरू आहेत. भाजपची सत्ता जिल्हा परिषद व पंचायत समितीवर आल्यानंतर या माध्यमातूनही अधिक निधी उपलब्ध होऊन विकासाला आणखी गती मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# खोपोलीत झाडे छटून टाकली गटारीत



> **विजतारांच्या खालील झाडे व गवत वाढले होते. त्यामुळे वारंवार विज पुरवठा खंडित होत होता. यामुळे वीज पुरवठ्यावर संभाव्य व्यत्यय टाळण्यासाठी म्हणून ही झाडे व गवत काढण्यात आली. गटारीत गवत व छाटलेल्या फांद्या टाकण्यात आल्या असतील तर त्याबाबत दक्षता घेतली जाईल.**
> **– मोहिते, उपअभियंता,**
> खोपोली महावितरण

**खोपोली : प्रतिनिधी**

मागील मंगळवारी २१ रोजी विशेष लोडशेडींग घेऊन खोपोली महावितरण व टाटा पॉवर कडून विजतारांच्या खालील किंवा ट्रान्सफार्मरच्या परिसरातील वाढलेली झाडे , गवताची छटाई केली गेली, मात्र छटाई केलेल्या झाडांच्या फांदया, गवत व इतर कचरा मात्र महावितरणने उचलला नाही.

या तोडलेल्या फांद्या किंवा गवत सरळ सार्वजनिक गार्डन व गटारीत टाकण्यात आला आहे. आठ दिवस होऊनही सदर फांद्या उचलण्याची तसदी संबंधित कंपन्याकडून घेतला जात नसून, नगरपालिका कडून ही याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते आहे. दुसरीकडे नागरिकांची मात्र मोठी गैरसोय होत असून शहरातील स्वच्छता ही बिघडली आहे.

एका बाजूला नगरपालिका कडून सर्वत्र स्वच्छता अभियान सुरू असून, दुसऱ्या बाजूला टाटा पॉवर व महाराष्ट्र विजवीतरण कंपनीकडून मात्र गार्डन, रस्त्यावर व गटारीत फांद्या टाकून स्वच्छता अभियान ला आवाहन देण्यात आले असल्याचे चित्र आहे. सामान्य नागरिकाने सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकल्यावर दंड आकारणी करणारे नगरपालिका प्रशासन टाटा पॉवर व वीज वितरण कंपनी बाबत कोणतीही भूमिका का घेत नाही या बाबतही शहरात चर्चा होत आहे.

# माणगाव येथे हिंदू संमेलन उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहरात शनिवार २५ एप्रिल रोजी सायंकाळी ४.३० वाजता आयोजित करण्यात आलेले विशाल हिंदू संमेलन अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडले. माणगाव व परिसरातील हिंदू बांधव–भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्यामुळे संमेलनाला भव्य स्वरूप प्राप्त झाले.

कार्यक्रमाची सुरुवात भारत माता पूजनाने प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ व पुस्तक देऊन सन्मानपूर्वक स्वागत करण्यात आले. संमेलनाचे अध्यक्ष अॅड. केदार गांधी यांनी आपल्या प्रास्ताविक व मनोगतात हिंदू समाजाच्या एकतेचे महत्त्व अधोरेखित केले. समाज विविध स्तरांत विभागला गेला असून, बलशाली राष्ट्र उभारण्यासाठी सर्वांनी एकत्र येणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. यानंतर अश्विनी समेळ यांच्या किशोरी विकास प्रकल्पांतर्गत मुलींनी लाठी–काठीचे आकर्षक प्रात्यक्षिक सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, रायगडचे संघचालक शिवराज वसंत भागवत यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात संघाच्या १०० वर्षांच्या कार्याचा आढावा घेत समाजातील बदलत्या परिस्थितीवर भाष्य केले. तसेच साक्षी कामत यांनी "पंच परिवर्तन" या विषयावर प्रभावी मांडणी करत स्वबोध, कुटुंब प्रबोधन, सामाजिक समरसता, पर्यावरण संरक्षण आणि नागरिक कर्तव्य या पाच महत्त्वाच्या मुद्द्यांवर उपस्थितांना मार्गदर्शन केले. प्रमुख व्याख्याते सौरभ महेश करडे यांनी आपल्या ओघवत्या शैलीत छत्रपती शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांच्या कार्याची आठवण करून देत हिंदवी स्वराज्याचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच वारकरी संप्रदायाच्या सर्वधर्मसमभावाच्या परंपरेवरही त्यांनी प्रकाश टाकला.

सूत्रसंचालन दीपक गुजर यांनी केले. भरत काळे यांनी आभार मानले. शेवटी पसायदानाने संमेलनाची सांगता करण्यात आली आणि सर्वांना महाप्रसाद ग्रहण करण्याचे आवाहन करण्यात आले. सर्व हिंदू संमेलन समिती कार्यकर्ते, सर्व बंधू भगिनी यांच्या नियोजनातून हिंदू संमेलन अत्यंत उत्साहात संपन्न झाला.



# पनवेल महापालिकेच्या स्थायी समिती विशेष सभेत विविध विषयांना मंजुरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा सोमवारी (दि.२७) आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहातील तिसऱ्या मजल्यावरील बैठक कक्षात स्थायी समिती सभापती बबन मुकादम यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी विविध विषयांना मंजूरी देण्यात आली.




स्थायी समितीचे सर्व सदस्य, अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे, अतिरीक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, महापालिका सचिव नानासाहेब कामठे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, उपायुक्त प्रसेनजित कारलेकर, मुख्य लेखाधिकारी निलेश नलावडे, शहर अभियंता संजय कटेकर, उपसचिव अक्षय कदम तसेच महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पनवेल महानगरपालिकेकरिता महाराष्ट्र सुरक्षा महामंडळ यांच्याकडून कंत्राटी पध्दतीने घेतलेल्या ३० सुरक्षा रक्षक यांस ११ महिने कालावधी करीता कंत्राटी पध्दतीने मुदतवाढ देणेबाबतच्या विषयास संबधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेऊन विषयास मंजूरी देण्यात आली.

प्रभाग समिती अ. खारघर मधील कोपरा तलाव (गणेश तलाव) लगत पादचारी पूल, संरक्षण भिंत व पावसाळी गटार बांधण्याच्या विषयास स्थायी समितीच्या सभेमध्ये मान्यता देण्यात आली. विविध १० ठिकाणी क्रॉप्स फिट मल्टी जिम स्टेशन बसविण्याच्या विषयास स्थायी समिती सदस्यांनी मंजूर दिली. आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामधील मध्यवर्ती वातानुकूलित यंत्रणेची दोन वर्षाकरिता दैनंदिन परिचालन देखभाल, दुरुस्ती, सुधारणा व नुतनीकरण करण्याच्या विषयास मंजूरी देण्यात आली.

पनवेल शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते पनवेल भाजी मार्केट रस्त्यावर मध्यभागी डेकोरेटिव्ह पथदिप खांब उभारुन कार्यान्वित करण्याच्या विषयास मंजूरी देण्यात आली. विहिरींची दुरूस्ती, पुनरूज्जीवन आणि जीर्णोध्दार या कामाकरिता प्राप्त न्युनतम निविदा दरास मान्यता मिळणेच्या विषयास मंजूरी देण्यात आली.

प्रभाग समिती अ. मधील खारघर नोड मधील अंतर्गत डांबरी रस्त्यांचे पुनपृष्टीकरण करणे. या कामाच्या सकारात्मक व नकारात्मकतेला मान्यता मिळणेबाबतच्या विषयास मंजूरी देण्यात आली. विविध प्रभागामध्ये आवश्यकतेप्रमाणे विविध ठिकाणी प्री फॅब्रिकेटेड शौचालय उभारणे या कामी न्युनतम दराची निविदा मंजुर करण्याच्या विषयास स्थायी समितीने मंजूरी दिली.

प्रभाग समिती क मधील कामोठे नोड मधील अंतर्गत डांबरी रस्त्यांचे पुर्नपृष्टीकरण करणे व इतर अनुषंगिक कामे करणे. या कामाच्या वाढीव खर्चास मान्यता मिळणेबाबतच्या विषयास माहिती घेऊन मंजूरी दिली. पनवेल महानगरपालिका अंतर्गत लहान मोठ्या प्राण्यांना पशुवैद्यकीय सेवेकरिता आवश्यक असणारी औषधे औषधी साहित्य व इतर सामग्री खरेदी करणेबाबतच्या विषयास मंजूरी देण्यात आली.

पनवेल महानगरपालिकेमार्फत राबविणेत येणारे जयंती उत्सव, साजरे करणेत येणारे सण व विविध कार्यक्रमानिमित्त इमारती, रस्ते, चौक व स्मारक या ठिकाणी दोन वर्षे कालावधीकरीता भाडेतत्वावर आकर्षित विद्युत रोषणाई उपलब्ध करुन देणे कामाच्या वाढीव खर्चास मान्यता मिळणे बाबतच्या विषयास मंजूरी देण्यात आली.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती अ, खारघर, सेक्टर १२ (भाग- अ) मधील अंतर्गत रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण व पावसाळी गटार बांधकाम करण्याच्या विषयास मंजूरी देण्यात आली. पनवेल महानगरपालिका हद्दीतील भिंगारी नांदगाव रोड येथे एम.एस.ई.बी. अ शौचालय पर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण व पावसाळी गटार बांधणे, तक्का येथील अंतिम भुखंड क्रमांक ४३६ ते ४३१ पावसाळी गटार बांधण्याच्या विषयास स्थायी समितीने मंजूरी दिली.

पनवेल महानगरपालिका अग्निशमन विभागातील कार्यरत सर्व कर्मचाऱ्यांना PPE किट खरेदी करण्याच्या विषयास एममताने मंजूरी देण्यात आली. पनवेल महानगरपालिकेत तीन वर्षाकरीता संगणकी साहित्य व उपकरणे पुरविणेबाबतच्या विषयास मंजूरी देण्यात आली. पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्राकरीता नागरी आयुष्यमान आरोग्य मंदिर (UHWC) स्थापन करण्यासाठी पोर्टा केबिन बसविणेबाबतचा विषय मंजूर करण्यात आला.

**निसर्ग संवर्धनाला प्राधान्य**

माझी वसुंधरा अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील उद्यान आणि रस्त्याच्या कडेला मियावाकी वृक्षारोपणासाठी पिसार्वे गाव व ओवे गाव येथे देखभाल करणे तसेच पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील मौजे ओवे गावातील राखीव वनक्षेत्रात मियावाकी पद्धतीचा वापर करून अतिरिक्त ८,८९० वृक्ष प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतच्या विषयास स्थायी समितीने मंजूरी दिली. पनवेल महानगरपालिका हद्दीत बसविण्यात आलेल्या बस थांब्यांची दैनंदिन साफसफाई करणेबाबतच्या विषयास समितीने मंजूरी दिली.

# सीकेटी विद्यालय इंग्रजी माध्यम प्राथमिक विभागातील शिक्षकांची नृत्य स्पर्धेत बाजी




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर विद्यालयातील इंग्रजी विभागातील शिक्षकांनी संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७५व्या वाढदिवसाचे औचित्य साधत मोरू नारायण म्हात्रे विद्यालय, गव्हाण कोपर यांनी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या शिक्षकांसाठी तालुकास्तरीय सामूहिक नृत्य स्पर्धेचे आयोजन केले होते.



चांगू काना ठाकूर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षकांनी सुंदर अश्या नृत्याचे सादरीकरण करत समस्त प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करत प्रथम क्रमांक मिळवून शाळेच्या नावलौकिकात भर घातली. स्पर्धेसाठी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या जवळ जवळ दहा शाळेतील शिक्षकांच्या ग्रुप्सने सहभाग घेतला होता.

शिक्षकांच्या या घवघवीत यशामुळे चांगू काना ठाकूर विद्यालयाचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि जे. बी.एस.पी.संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या सदस्या वर्षा ठाकूर यांनी विजेत्या शिक्षकांचे विशेष कौतुक करत शाब्बासकीची थाप दिली.

आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाइस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव डॉ. एस.टी. गडदे, संस्थेचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापिका निलिमा शिंदे, पर्यवेक्षिका वैशाली पारधी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी विजेत्या ग्रुपचे विशेष अभिनंदन केले.



**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, महापौर नितीन पाटील, माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली सभागृह नेते ॲड. प्रकाश बिनेदार यांच्या पाठपुराव्यामुळे लोकमान्य नगर रेल्वे मालधक्का येथील नऊ झोपडपट्टीधारकांना न्याय मिळाला. त्यामुळे झोपडी धारकांनी ॲड. प्रकाश बिनेदार यांची भेट घेऊन आभार मानले. यावेळी भाजप कार्यकर्तेही उपस्थित होते.**

# वैद्यकीय शतकोत्सव कार्यक्रमाचा समारोप

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वाशी येथील हॉटेल ताज विवान्ता येथे Panvel Doctors General Practitioners Associationच्या १००व्या CME (वैद्यकीय शतकोत्सव) कार्यक्रमाचा उत्साहात समारोप झाला.



या सोहळ्यास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी डॉक्टर बांधवांना शुभेच्छा देत शंभरावी CME साजरी करण्याच्या या महत्त्वपूर्ण टप्प्याबद्दल आयोजकांचे कौतुक केले. वैद्यकीय क्षेत्रातील सातत्यपूर्ण शिक्षण व अद्ययावत ज्ञानाची देवाणघेवाण यासाठी CME उपक्रम अत्यंत महत्त्वाचे असल्याचे यावेळी नमूद केले. वैद्यकीय व्यवसाय हा केवळ पेशा नसून सेवा, समर्पण आणि समाजाप्रती असलेल्या बांधिलकीचे उत्तम उदाहरण आहे. अत्यंत ताणतणावाच्या परिस्थितीत दिवस-रात्र रुग्णसेवा करणाऱ्या डॉक्टरांचे यावेळी विशेष कौतुक करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

कोरोना महामारीच्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाने संकटावर मात करण्याचा प्रयत्न केला, यामध्ये देशातील डॉक्टरांचे योगदान अत्यंत मोलाचे ठरले. स्वतःचा जीव धोक्यात घालून रुग्णांची सेवा करणाऱ्या डॉक्टरांची सेवा देश कधीही विसरणार नाही, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

या कार्यक्रमास लोकनेते रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ नेते जे.एम.म्हात्रे, महापौर नितीन पाटील, डॉ. गिरीश गुणे, कामगार नेते महेंद्र घरत, डॉ. आनंद गोसावी, डॉ. अपर्णा पवार, डॉ. वैभव मोकळ, डॉ. आशिष गांधी, डॉ. वसंत पाटील यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

# वडाळे तलाव येथे महापौरांचा नागरिकांशी संवाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि नागरिकांच्या अडचणी प्रत्यक्ष जाणून घेण्यासाठी महापौर नितीन पाटील यांनी सोमवारी सकाळी पनवेलमधील ऐतिहासिक वडाळे तलाव येथे मॉर्निंग वॉक व योगाभ्यासासाठी आलेल्या नागरिकांशी थेट संवाद साधला.



यावेळी महापौरांनी नागरिकांच्या समस्या, सूचना आणि अपेक्षा लक्षपूर्वक ऐकून घेतल्या. दैनंदिन जीवनाशी संबंधित विविध अडचणी तत्काळ सोडवण्यासाठी संबंधित विभागांशी चर्चा करून आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. महापौर नितीन पाटील यांनी सांगितले की, "पनवेल शहराचा विकास हा नागरिकांच्या सहभागातूनच शक्य आहे. त्यामुळे अशा प्रत्यक्ष भेटींतून नागरिकांचे प्रश्न समजून घेऊन त्यावर त्वरित कार्यवाही करणे ही आमची प्राथमिकता आहे.

यावेळी भाजप पनवेल शहर सरचिटणीस रुपेश नागवेकर उपस्थित होते.

# खारघर येथील रामशेठ ठाकूर महाविद्यालयात उद्या आंतरराष्ट्रीय परिषद

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात बुधवार २९ एप्रिल रोजी सकाळी १०.३० वाजता वर्कशॉप व सेमिनार कमिटी आणि अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष यांच्यामार्फत नवकल्पनांना चालना देण्यासाठी एक दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे.

आंतरराष्ट्रीय परिषदेचा मुख्य विषय इनोवेशन फॉर सस्टनेबल डेव्हलपमेंट : इंटिग्रेटिंग सायन्स टेक्नॉलॉजी अँड कॉमर्स हा असून ही परिषद ऑनलाईन स्वरूपात होणार आहे. तरी जगभरातील संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी आणि उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या परिषदेत वाणिज्य व व्यवस्थापन तसेच विज्ञान व तंत्रज्ञान या दोन प्रमुख विभागांतर्गत विविध उपविषयांचा समावेश करण्यात आला आहे.

वाणिज्य विभागात कॉर्पोरेट गव्हर्नन्स, उद्योजकता, बिझनेस मॅनेजमेंट, ऑडिटिंग, स्ट्रॅटेजिक मॅनेजमेंट, ई-बिझनेस सेवा, अकाउंटिंग थिअरी अँड प्रॅक्टिसेस आणि गुंतवणूक यांसारख्या विषयांवर संशोधन निबंध सादर करण्याची संधी उपलब्ध आहे तर विज्ञान व तंत्रज्ञान विभागात नवीकरणीय ऊर्जा, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), ऊर्जा साठवण उपकरणे, स्मार्ट मटेरियल्स, कॉम्प्युटेशनल मॉडेलिंग, क्वांटम कम्प्युटिंग, जीनोमिक्स, ब्लॉकचेन, सायबर सिक्युरिटी, पर्यावरण अभ्यास, नॅनोतंत्रज्ञान, अनालिटिकल मेथड डेव्हलपमेंट आणि ग्रीन व सस्टेनेबल केमिस्ट्री या अत्याधुनिक विषयांचा समावेश आहे.

या परिषदेचा उद्देश विविध शाखांमधील ज्ञानाचा समन्वय साधून नवकल्पना आणि विकासाला चालना देणे हा आहे. बदलत्या जागतिक परिप्रेक्ष्यात उद्योग, शिक्षण आणि संशोधन क्षेत्रांमध्ये बहुविषयक दृष्टिकोनाची गरज अधोरेखित करण्यासाठी ही परिषद महत्त्वाची ठरणार आहे. या परिषदेसाठी जास्तीत जास्त सहभाग नोंदवून संशोधन व ज्ञानविनिमयाला चालना द्यावी, असेही आवाहन करण्यात आले आहे. या परिषदेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे असून समन्वयक म्हणून प्रा. प्रथमेश उदेकर कार्यरत आहेत तसेच त्यांनी या परिषदेसाठी संशोधक, प्राध्यापक व इतर शिक्षण क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींना नोंदणी करण्यासाठी आव्हान केले आहे.

ही परिषद संशोधन क्षेत्रात नवीन दिशा देणारी ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. सदर परिषद यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी हे मेहनत घेत आहेत. अधिक माहितीसाठी ८७८८११३८३६ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पनवेल मिडलक्लास सोसायटी परिसरात हिंदू संमेलन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मिडलक्लास सोसायटी, रोहिदास वाडा, मार्केट यार्ड वसाहत यांचे 'हिंदू संमेलन' रविवारी उत्साहपूर्ण वातावरणात झाले. मिडल क्लास सोसायटी येथील श्री गणेश मंदिर परिसरात पार पडलेल्या या कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.




संमेलनात सनातन धर्म संवर्धन, सामाजिक एकजूट आणि संस्कृती जपण्याच्या विषयांवर प्रबोधनपर व्याख्याने व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख वक्ते ॲड. श्रीराम ठोसर यांनी आपल्या प्रभावी भाषणातून हिंदू समाजातील एकात्मता आणि जागरूकतेचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी मातृशक्तीच्या हस्ते उद्‍घाटन करण्यात आले.

यावेळी कोमल कोळी यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाला विशेष रंगत आली. तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सहकार्यवाह कुणाल मानकापे यांनी मार्गदर्शन करत समाजातील संघटन व राष्ट्रभक्तीची गरज स्पष्ट केली. या संमेलनाच्या माध्यमातून समाजात एकोप्याचा आणि संस्कारांचा संदेश तसेच विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

# सुरक्षा भिंत पाडली; गुन्हा दाखल

**पनवेल :** दगड व सिमेंटमध्ये बांधलेली सुरक्षा भिंत ही भिती दाखविण्यासाठी पाडल्याने सदर आरोपी विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दिलीजितसिंग बाल (७५ रा.मानखुर्द) यांच्या मालकीच्या हक्काची व ताबेकब्जातील मौजे : शिरढोण, ता.पनवेल येथील सर्व्हे नं.२२६/अ/१ मधील चार फुटी उंचीची व १७० फुट लांबीची दगड व सिमेंटमध्ये बांधलेली सुरक्षा भिंत आरोपीने सदर ठिकाणी बेकायदेशीररित्या प्रवेश करून त्यांना भिती दाखविण्यासाठी सदर सुरक्षा भिंत पाडून त्यांचे चार लाखांचे नुकसान केले म्हणून पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सपोनि सचिन पोवार करीत आहेत.

# लग्नाचे आमिष दाखवून महिलेवर अत्याचार

**पनवेल :** लग्नाचे आमिष दाखवून महिलेवर अत्याचार केल्याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात आरोपी शिवाजी श्रीमंत वाघमोडे (रा. सेक्टर २५, कामोठे) याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. ७ ते १३ फेब्रुवारी या दरम्यान आरोपीने पीडित महिलेला लग्न करणार आहे असे खोटे सांगितले आणि तिच्यासोबत जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवले. त्यानंतर पडितेने लग्नाविषयी वेळोवेळी विचारणा केली असता त्याने लग्न करण्यास नकार दिला. त्यामुळे आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# देवी-देवतांबद्दल आक्षेपार्ह वक्तव्यप्रकरणी कारवाई

**पनवेल :** देवी-देवतांबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केल्याप्रकरणी आरोपी मोहम्मद दानिश नौशाद अन्सारी (रा. पटेल ज्वेल्स बिल्डिंग, सेक्टर १७ उलवे) याच्या विरोधात उलवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. यातील फिर्यादी हे डेली मार्ट समोरील भाजीवाला सद्‍गुरू चौक, ऊलवे यांच्याकडे भाजी घेण्यासाठी गेले असताना भाजी विक्रेता मोहम्मद दानिश नौशाद अन्सारी याने हिंदू देवतांबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केले.

# उन्हामुळे बाजारपेठेत सायंकाळनंतर गर्दी

**पनवेल :** उन्हाची तीव्रता वाढत आहे. यामध्ये सकाळी ११ नंतर दुपारी ४ वाजेपर्यंत बाजारपेठांमध्ये नागरिकांची वरदळ तुरळकच दिसते, मात्र सायंकाळी ५ नंतर बाजारपेठांमध्ये मोठी गर्दी झालेली असते. परिणामी वाहतूक कोंडीचा सामनाही करावा लागतो.

## संपादकीय

# संस्कृतीची ‘चव’

भारताच्या खाद्यसंस्कृतीची चव, परंपरा आणि गुणवत्ता यांच्या नव्या अनुभवाने जगाचे भारताशी एक नवे सांस्कृतिक नाते निर्माण होण्याचा विश्वास रुजविण्यात महाराष्ट्राने उचललेला हा खारीचा वाटा मराठमोळ्या समाजसूहासाठी समाधानकारक म्हणावा लागेल.

**कोणत्याही परंपरा किंवा संस्कृतीचे वेगवेगळे रंग असतात. त्यातून समाजजीवनाचे पदर उलगडत जातात, म्हणून परंपरा जपण्याच्या प्रयत्नांची गरज अबाधित राहिली आहे. केवळ समूह करून जगणे एवढेच समाजाचा स्वभाव नाही, तर अशा अनेक समूहांना समजून घेणे, त्यातील परंपरांची आणि संस्कृतीची देवाणघेवाण करणे, त्यातून योग्य त्या बाबी सामावून घेत आपली संस्कृती समृद्ध करणे हीदेखील सामाजिक विकासाची एक प्रक्रिया असते. म्हणूनच, अन्न ग्रहण किंवा खाणे ही केवळ पोट भरण्याची किंवा जगण्यासाठी गरजेची असलेली एक क्रिया न राहता, तीदेखील एक संस्कृती ठरते. आपल्या देशात खाण्यापिण्याची परंपरा फक्त चवीपुरती मर्यादित राहिलेली नसून याला खाद्यसंस्कृती असे म्हटले जाते. अशा संस्कृतीची प्रतिष्ठा जपणे ही सामाजिक जबाबदारी असते, आणि त्यास राजाश्रय मिळतो, तेव्हा त्या संस्कृतीचे भविष्यदेखील उजळते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ‘मन की बात’ या संवाद सत्राच्या ताज्या भागात महाराष्ट्राच्या खाद्यसंस्कृतीचा गौरवास्पद उल्लेख करून या संस्कृतीचा राजाश्रय अधोरेखित केल्याने महाराष्ट्राच्या खाद्यसंस्कृतीचा आणि परंपरेचा एक अनोखा पैलूदेखील उलगडला आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक दृष्टीने ही अभिमानास्पद आणि समाधानकारक बाब म्हणावी लागेल. ब्राझीलमधील एका आंतरराष्ट्रीय चीज स्पर्धेत भारतीय ‘चीज’च्या दोन ब्रँड्सना प्रतिष्ठित पुरस्कार मिळाल्याने भारताच्या आणि महाराष्ट्राच्या खाद्यसंस्कृतीतील हा पदार्थ आता प्रतिष्ठेच्या शिखरावर दाखल होणार असून चीज नावाच्या पदार्थास जन्म देणाऱ्या दुग्धव्यवसायाची मानदेखील उंचावणार आहे. भारताच्या दुग्धव्यवसाय क्षेत्रात खूप मोठा बदल घडून येत आहे. या क्षेत्रात सुरू असलेल्या नवनव्या प्रयोगांनी, तर आपल्या पारंपरिक चवीला एक नवीन ओळख मिळवून दिली आहे. गुजरातमध्ये ‘टोपली नु पनीर’ नावाने ओळखला जाणारा पदार्थ महाराष्ट्रात ‘सुरती चीज’ म्हणून घराघरात पोहचला असून दोन राज्यांच्या खाद्यसंस्कृतीचा सुंदर मिलाफ म्हणून सुरती चीज एका सदिच्छादूताची भूमिका बजावत आहे. आपल्या देशातील चवीचे हे जग खूप व्यापक आहे. अशा संस्कृती संगामातूनच आज खाद्यसंस्कृतीच्या परंपरेला नवे बळ मिळू लागले असून त्यातून अनेक नव्या संधींचे दरवाजेही उघडले आहेत. अनेक भारतीय कंपन्या या क्षेत्रात गुंतवणूक करत आहेत, आधुनिक तंत्रज्ञान येत आहे, उत्तम पॅकेजिंग केले जात आहे आणि आपली उत्पादने जागतिक मानकांनुसार प्रगती करत आहेत. त्यातून रोजगाराच्या संधी निर्माण होत असल्याने हा व्यवसाय म्हणजे अनेक कुटुंबांच्या उत्कर्षाचा आधारही ठरू पाहात आहे. आता तर भारतीय चीजने जगातील बाजारपेठांमध्येही आपली ओळख रुजविल्याने पंतप्रधानांची ‘लोकल टू ग्लोबल’ ही संकल्पना साकारण्यात महाराष्ट्राच्या खाद्यसंस्कृतीचा मोठा वाटा राहणार आहे. महाराष्ट्रातील सण–उत्सवांनीही खाद्यसंस्कृती संपन्न करण्यात महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. गणेशोत्सवातील मोदक, मकर संक्रांतीचा तीळगूळ, पाडव्याची पुरणपोळी, दिवाळीचा फराळ आदी चवींना महाराष्ट्राच्या सामाजिक विविधतेमध्ये रंग भरले आहेत. म्हणूनच, महाराष्ट्राची खाद्यसंस्कृती ही सामाजिक विविधतेचे जिवंत उदाहरण आहे. ही विविधता म्हणजे प्रदेश, धर्म, परंपरा आणि आधुनिकतेचा संगम असून प्रत्येक घटकाने तिच्या चवीत आणि स्वरूपात वेगळेपण आणले आहे. पंतप्रधानांनी या संस्कृतीचा गौरव करून महाराष्ट्राचाही गौरव केला ही अभिमानाची बाब आहे.**

# उष्माघाताचा वाढता धोका : खबरदारी घ्या, संकट टळेल!

राज्यात एप्रिल–मे महिन्यात तापमानाचा पारा सातत्याने वाढत असून अनेक भागांत तीव्र उष्णतेची लाट जाणवत आहे. सकाळपासूनच उन्हाची तीव्रता वाढत असल्याने दुपारच्या वेळेत नागरिकांना घराबाहेर पडणे कठीण होत आहे. वाढत्या तापमानामुळे उष्माघात, निर्जलीकरण, अशक्तपणा, चक्कर येणे, मळमळ, थकवा यांसारख्या समस्या मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहेत. त्यामुळे नागरिकांनी योग्य काळजी घेणे आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करणे अत्यंत आवश्यक झाले आहे.

उष्माघात हा केवळ उन्हामुळे होणारा त्रास नसून तो गंभीर वैद्यकीय आपत्कालीन प्रकार ठरू शकतो. शरीराचे तापमान झपाट्याने वाढते आणि शरीराला स्वतःला थंड ठेवणे शक्य होत नाही, तेव्हा उष्माघात होतो. वेळेत उपचार न मिळाल्यास बेशुद्धावस्था, अवयव निकामी होणे आणि जीवितास धोका निर्माण होऊ शकतो.

उष्माघाताची सुरुवातीची लक्षणे ओळखणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अनेकदा लोक सामान्य थकवा समजून दुर्लक्ष करतात. खालील लक्षणे आढळल्यास त्वरित सावध व्हावे : तीव्र तहान लागणे,जास्त घाम येणे किंवा घाम बंद होणे, डोके गरगरणे अशक्तपणा आणि थकवा, उलटी किंवा मळमळ, त्वचा लालसर व गरम होणे, चक्कर येणे, गोंधळ, बेचैनी, बेशुद्ध पडणे ही लक्षणे दिसल्यास तत्काळ थंड जागी नेऊन वैद्यकीय मदत घ्यावी.

**सर्वसामान्य नागरिकांनी काय करावे?**

पुरेसे पाणी प्या, उन्हाळ्यात शरीरातील पाणी झपाट्याने कमी होते. त्यामुळे तहान लागली नसली तरी वेळोवेळी पाणी पिणे आवश्यक आहे. प्रवास करताना पाण्याची बाटली सोबत ठेवावी. ओआरएस, लिंबूपाणी, ताक, लस्सी, नारळपाणी, फळांचे रस यांचा उपयोग करावा. पाण्याने समृद्ध फळांचा आहार घ्या.टरबूज, खरबूज, द्राक्षे, संत्री, काकडी, अननस, टोमॅटो, कोशिंबीर यांसारखी फळे व भाज्या खाव्यात. यामुळे शरीरात पाण्याचे प्रमाण टिकून राहते.

**योग्य कपडे परिधान करा**

पातळ, सैल, सुती आणि फिकट रंगाचे कपडे वापरावेत. काळ्या किंवा जाड कपड्यांमुळे उष्णता जास्त जाणवते. बाहेर पडताना टोपी, स्कार्फ, छत्री, गॉगल वापरावा.घर थंड ठेवा, दिवसा उन्हाच्या बाजूच्या खिडक्या, पडदे बंद ठेवावेत. रात्री थंड हवा येण्यासाठी खिडक्या उघडाव्यात. शक्य असल्यास घरातील खालच्या मजल्यावर राहावे.

**काय करू नये?**

दुपारी १२ ते ३ या वेळेत उन्हात बाहेर पडणे टाळावे.अनावश्यक प्रवास टाळावा.अति व्यायाम किंवा श्रमाची कामे करू नयेत.चहा, कॉफी, मद्य, कोल्ड ड्रिंक्स जास्त प्रमाणात घेऊ नयेत.शिळे अन्न टाळावे.अनवाणी बाहेर जाऊ नये. बंद वाहनात मुले किंवा पाळीव प्राणी सोडू नयेत.

**कोणाला अधिक धोका?**

काही व्यक्तींना उष्णतेचा जास्त धोका असतो. त्यांची विशेष काळजी घ्यावी.लहान मुले व बालके,वृद्ध नागरिक,गर्भवती महिला,शारीरिक श्रम करणारे कामगार,हृदयविकार, मधुमेह, उच्च रक्तदाब असलेले रुग्ण,मानसिक आजार असलेले व्यक्तीअशा व्यक्तींना वारंवार पाणी द्यावे, सावलीत ठेवावे आणि आरोग्याची नियमित चौकशी करावी.

**कामगारांसाठी विशेष सूचना**

बांधकाम, शेती, रस्ते कामे, कारखाने, वाहतूक क्षेत्रातील कामगार दिवसभर उन्हात काम करत असल्याने त्यांना मोठा धोका असतो. कामाच्या ठिकाणी थंड पिण्याचे पाणी उपलब्ध करावे. दर २० मिनिटांनी पाणी पिण्याची सूचना द्यावी. सावलीत विश्रांतीची व्यवस्था करावी. सकाळी व संध्याकाळी कामाचे नियोजन करावे. जड कामात विश्रांतीची वेळ वाढवावी. उष्माघाताची लक्षणे ओळखण्यासाठी प्रशिक्षण द्यावे.

**उष्माघात झाल्यास प्रथमोपचार**

कोणाला उष्माघाताचा त्रास होत असल्यास : व्यक्तीला त्वरित सावलीत किंवा थंड जागी आणा. घट्ट कपडे सैल करा.थंड पाण्याने अंग पुसा. पंखा लावा किंवा हवा द्या.व्यक्ती शुद्धीत असल्यास पाणी द्या.त्वरित डॉक्टरांकडे घेऊन जा. सामूहिक कार्यक्रमांमध्येही काळजी आवश्यक : मेळावे, यात्रा, क्रीडा स्पर्धा, राजकीय सभा किंवा गर्दीच्या कार्यक्रमांत उष्णतेचा धोका वाढतो. अशा ठिकाणी पिण्याचे पाणी, सावली, वैद्यकीय सुविधा आणि आपत्कालीन व्यवस्था असणे आवश्यक आहे.

उष्माघात हा टाळता येण्याजोगा धोका आहे. वेळेवर पाणी पिणे, सावलीत राहणे, योग्य कपडे वापरणे आणि दुपारच्या उन्हापासून दूर राहणे या साध्या उपायांनी गंभीर परिणाम टाळता येतात. वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक नागरिकाने स्वतःची आणि कुटुंबाची काळजी घेणे ही काळाची गरज आहे. “उन्हापासून बचाव करा, पाणी प्या आणि सुरक्षित रहा.”

**–साभार : रायगड जिल्हा माहिती कार्यालय**

# मेळघाट हाट : महिलांच्या उत्पादनांना हक्काचे व्यासपीठ

अमरावती जिल्ह्यातील मेळघाट क्षेत्रातील दुर्गम भागात राहणाऱ्या स्वयंसहाय्यता महिला बचतगटांच्या श्रमाला आणि त्यांच्या कौशल्यातून साकारलेल्या उत्पादनांना ‘मेळघाट हाट’ विक्री केंद्राच्या माध्यमातून हक्काचे व्यासपीठ प्राप्त झाले आहे. महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक सशक्तीकरणासाठी राबविण्यात आलेल्या अशा अभिनव उपक्रमांना सर्व स्तरावरून प्रोत्साहन मिळत आहे. जिल्हा वार्षिक योजनेतून जिल्हा परिषद, महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने अमरावती येथे सायन्सकोर प्रांगणालगत आधुनिक महिला बचत गट उत्पादन विक्री केंद्र सुरु आहे. हे विक्री केंद्र ५ जानेवारी २०२५ पासून नागरिकांच्या सेवेत आहे.

मेळघाट हाटच्या माध्यमातून आदिवासी क्षेत्रातील उत्पादित साहित्याला प्रथमच शहराच्या मध्यवस्तीत हक्काचे विक्री केंद्र मिळाले आहे. या मॉलच्या माध्यमातून उत्पादित वस्तूंची थेट ग्राहकांना विक्री होत असल्याने मध्यस्थांची साखळी मोडीत निघत असून बचत गटातील महिलांच्या उत्पन्नात विशेष वाढ होत आहे. या ठिकाणी ग्राहकांसाठी मेळघाटातील वैविध्यपूर्ण वनौषधी, बांबूपासून बनविलेल्या कलाकुसरीच्या वस्तू, रानमेवा आणि शुद्ध मध यासारख्या दुर्मिळ वस्तूंची मोठी श्रेणी खरेदीसाठी उपलब्ध आहे. आदिवासी महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी महिला बचत गटांना सातत्याने प्रोत्साहन देऊन आदिवासी क्षेत्रात जास्तीत–जास्त बचत गटांचे जाळे निर्माण करणे हे प्रशासनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. महिलांची कला–कौशल्याला योग्य दिशा मिळावी तसेच ग्राहकांच्या मागणीनुसार उत्पादनात वैविध्य आणून त्यांना मोठी बाजारपेठ मिळवून देण्यासाठी मेळघाट हाटची निर्मिती करण्यात आली आहे.

विक्रीसाठी आणलेल्या साहित्यांना राष्ट्रीय स्तरावर योग्य भाव मिळण्यासाठी विक्री साहित्याचे उत्तम मार्केटिंग, आकर्षक पॅकिंग व प्रभावी ब्रँडिंग करणे ही काळाची गरज आहे. हीच बाब लक्षात घेऊन महिला बचत गटांना या तांत्रिक बाबींचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. या उत्पादित मालाला राज्यासह संपूर्ण देशात बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनामार्फत विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. मेळघाटातील धारणी तसेच चिखलदरा तालुक्यातील स्वयंसहाय्यता महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या मालाला कायमस्वरूपी बाजारपेठ मिळावी याच हेतूने हे मेळघाट हाट विक्री केंद्र सुरू करण्यात आले आहे. या केंद्राचे वैशिष्ट्य म्हणजे येथे एकाच छताखाली मेळघाटातील ४७ प्रकारच्या विविध वस्तू विक्रीसाठी उपलब्ध आहेत. प्रथम टप्प्यात एकूण ६० स्वयंसहाय्यता महिला बचत गटांच्या उत्पादनांचा यात समावेश करण्यात आला होता. त्यामध्ये प्रामुख्याने बांबूपासून निर्मित विविध उत्पादने, तृणधान्यांमध्ये सावा, कुटकी, ज्वारी, बाजरी तसेच कडधान्य, गहू, लाल तांदूळ, तूर दाळ, विविध प्रकारची लोणची, चिखलदऱ्याची जगप्रसिद्ध कॉफी, मध आणि शुद्ध तूप यांचा समावेश आहे. याशिवाय गृहशोभेच्या वस्तू आणि आरोग्याच्या दृष्टीकोनातून पौष्टिक खाद्यान्ने देखील येथे उपलब्ध आहेत. या केंद्राला आधुनिक मॉलचे स्वरूप देण्यात आले असून, येथे स्वतंत्र गोदाम, पॅकेजिंग आणि लेबलिंग युनिटची व्यवस्था करण्यात आली आहे, ज्यामुळे ग्राहकांना खरेदीचा एक वेगळा अनुभव मिळत आहे.

खादी व ग्रामोद्योग मंडळ आणि महिला आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने स्वातंत्र्यदिनानिमित्त मेळघाट हाट येथे ‘खादी महोत्सवा’चेही आयोजन करण्यात आले होते. यावेळी कस्तुरबा सोलर खादी महिला समिती अंतर्गत धारणी तालुक्यातील महिलांनी कापसापासून सूत आणि सुतापासून कापड ते गारमेंटपर्यंतच्या उत्पादनांची निर्मिती करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

प्रशासनाच्या या अभिनव उपक्रमामुळे मेळघाटातील आदिवासी महिला भगिनींच्या बचत गटांना विक्री आणि विपणनासाठी एक सक्षम प्लॅटफॉर्म मिळाला असून यामुळे महिला सक्षमीकरणासह आदिवासी क्षेत्रातील आर्थिक विकासाला निश्चितच मोठी गती मिळणार आहे.

**–अपर्णा यावलकर,**
माहिती अधिकारी, अमरावती



## बदलते तंत्रज्ञान

# ASUSचा नवा धमाका! लाँच केला नवा लॅपटॉप

तुम्ही कधी असा लॅपटॉप पाहिलाय का, जो इतका हलका आहे की प्रवासात सहज बरोबर नेता येईल; पण कामगिरी मात्र एखाद्या शक्तिशाली डेस्कटॉपलाही मागे टाकेल अशी आणि हो त्याची किंमत ऐकून क्षणभर थांबायला भाग पाडेल. ASUS नं नुकताच असा एक प्रीमियम आणि अत्याधुनिक लॅपटॉप सादर केला आहे, ज्याने टेक विश्वात खळबळ उडवलीय.



२२ एप्रिल २०२६ रोजी दिल्ली येथे झालेल्या एका भव्य कार्यक्रमात ASUSने AI–आधारित ExpertBook Ultra चे अनावरण केले. हा लॅपटॉप केवळ दिसण्यातच नव्हे, तर परफॉर्मन्स, इनोव्हेशन आणि बिझनेस वापरासाठी असलेल्या खास वैशिष्ट्यांमुळेही चर्चेत आहे. विशेष म्हणजे या कार्यक्रमात Ultra–Immersive Demo Zoneमध्ये उपस्थितांना या डिव्हाइसचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी मिळाली.

या लॅपटॉपमध्ये वापरण्यात आलेले ‘टँडेम OLED’ तंत्रज्ञान खरोखरच गेम–चेंजर ठरत. हे तंत्रज्ञान साधारण स्क्रीनपेक्षा ४०% कमी वीज वापरतं, पण ब्राईटनेस इतका जास्त आहे की, उन्हातही स्क्रीन स्पष्ट दिसते. त्याशिवाय ३K रिझोल्यूशनमुळे प्रत्येक व्हिज्युअल जिवंत भासते.

परफॉर्मन्सच्या बाबतीतही हा लॅपटॉप पुढे आहे. त्यात Intel Core Ultra Series ३ प्रोसेसर देण्यात आला आहे. AI–आधारित कामं, ग्राफिक्स आणि मल्टीटास्किंगसाठी तो अत्यंत वेगवान आहे.

हा लॅपटॉप केवळ ०.९९ किलो वजनाचा असून, तो अत्यंत पोर्टेबल आहे. त्यात ७०Wh बॅटरी देण्यात आली आहे, जी एकदा चार्ज केल्यावर तब्बल २६ तासांपर्यंत चालू शकते. फास्ट चार्जिंगमुळे बॅटरी फक्त ३० मिनिटांत ५०% चार्ज होते म्हणजे कामात खंड पडत नाही.

फक्त १०.९ मिमी जाडी असलेल्या या लॅपटॉपमध्ये सहा स्पीकर्सचा सेटअप दिला आहे. त्यात दोन वूफर्स आणि दोन ट्विटर असल्यामुळे आवाज खोल, स्पष्ट आणि ३D चा अनुभव देणारा आहे. व्हिडीओ मीटिंग असो किंवा चित्रपट; बाह्य स्पीकर्सची गरजच भासत नाही.

हा प्रीमियम लॅपटॉप फ्लिपकार्टवर २२ एप्रिलपासून प्री–ऑर्डरसाठी उपलब्ध झाला आहे, जो २९ एप्रिल २०२६ पर्यंत सुरू राहणार आहे. त्याची सुरुवातीची किंमत आहे तब्बल २,३९,९९० रुपये आणि याच किमतीमुळे तो चर्चेचा विषय ठरला आहे.

# साहित्यिक मधु मंगेश कर्णिक



## निमित्त

आपल्या आगळ्यावेगळ्या व विपुल साहित्यनिर्मितीचे स्वतंत्र स्थान निर्माण करणाऱ्या लेखकांत मधु मंगेश कर्णिक यांचे नाव महत्त्वपूर्ण आहे. मधु मंगेश कर्णिक यांचा जन्म. २८ एप्रिल १९३१ रोजी करुळ, ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग येथे झाला. प्राथमिक शिक्षण करुळ येथील शाळेत, तर कणकवली येथे माध्यमिक शिक्षण झाले. इच्छा असूनही त्यांना प्रतिकूल परिस्थितीमुळे पुढे शिक्षण घेता आले नाही. ९ फेब्रुवारी १९५२ रोजी एसटी कॉपरेरेशनमध्ये ज्युनिअर क्लार्क म्हणून नोकरीस लागलेल्या कर्णिकांनी साहित्य निर्मितीसही सुरुवात केली.

मधु मंगेश कर्णिक यांची पहिली कथा कृष्णाची राधा ही रत्नाळकर मासिकातून प्रसिद्ध झाली. ’कोकणी गं वस्ती’ हा त्यांचा पहिला कथासंग्रह. कथा, कविता, नाटक, कादंबरी, ललित गद्य, बालवाङ्मय, अशा सर्वच साहित्यप्रकारांमध्ये लेखन केले . मधु मंगेश कर्णिक यांनी आशयाच्या अंगाने मराठी कादंबरीत वैविध्य आणले. देवकी, सूर्यफूल, निरभ्र, माहीमची खाडी, भाकरी आणि फूल, जेईली, सनद, कातळ, वारुळ, संधिकाल या कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. ज्या भूमीशी आपली नाळ बांधली गेली आहे, त्या भूमीशी आत्मियतेने बंध राखून आणि आपल्या अनुभव विश्वाशी निगडित राहून त्यांनी प्रदीर्घकाळ कथालेखन केले. कोकणी गं वस्ती, पारघ, तोरण, मंत्र, भुईचाफा, मांडव, गुजा, संकेत, तहान, डोलकाठी, झुंबर, केवढा, गवळण, अनिकेत, उत्तरायण इत्यादी ४१ कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत.


मधु मंगेश कर्णिक कथाकार, कादंबरीकार म्हणून सुप्रसिद्ध आहेत. इतर चौफेर लेखनही त्यांनी केले असून ते कवीसुद्धा आहेत. त्यांचा ‘शब्दांनो, मागुते या’ हा पहिला काव्यसंग्रह २८ एप्रिल २००१ रोजी प्रकाशित झाला. त्यात ८५ कविता आहेत. मधु मंगेश कर्णिक यांची ललित गद्यात समाविष्ठ होणारी दहा पुस्तके आहेत. सोबत, नैऋत्येकडचा वारा, जिवा भावाचा गोवा, माझा गाव माझा मुलुख या पुस्तकांचा समावेश होतो. त्यांनी ‘देवकी’ व ‘केला तुका झाला माका’ ही दोन नाटके लिहिली. दूत पर्जन्याचा हे चरित्र, जगन्नाथ आणि कंपनी, शाळेबाहेरील सौंगडी, चिमणचारा, गोड गोड चिमणचारा ही खास लहान मुलांसाठी लिहिलेली पुस्तके प्रकाशित झाली आहेत. कर्णिक यांच्या ‘स्वप्नपूर्ती’ या कथेवर ‘घुंगरू’ हा हिंदी चित्रपट प्रकाश मेहरा यांनी दिग्दर्शित केला. भाकरी आणि फूल, जुईली, रानमाणूस या कथा–कादंबऱ्यांवर आधारित दूरदर्शन मालिका विलक्षण गाजल्या व लोकप्रिय झाल्या.

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष होते व राज्य मराठी विकास संस्थेचे अतिरिक्त संचालक आहेत. ते कोकण कला अकादमी, नाथ पै वनराई ट्रस्ट यांचे संस्थापकही आहेत. त्यांनी ‘करूळ पंचक्रोशी शिक्षण प्रसार मंडळ’ स्थापन केले आणि त्या मंडळाचे करूळ ज्ञानप्रबोधिनी हायस्कूलही सुरू केले.

कोकण मराठी साहित्य परिषदेच्या स्थापनेत त्याचा सिंहाचा वाटा होता. कोकणातील मालगुंड येथे केशवसुतांचे सुंदर स्मारक उभारण्यासाठी त्यांनी अपार कष्ट घेतले. भारत सरकारने त्यांचा ‘पद्मश्री’ पुरस्कार देऊन गौरव केला आहे.

(साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# जंक फूडमुळे वंध्यत्वाचा धोका वाढतो दुपटीने

आजच्या धकाधकीच्या जीवनात आणि बदलत्या जीवनशैलीमुळे वंध्यत्व ही केवळ वैद्यकीय समस्या न राहता एक मोठे आव्हान बनली आहे, मात्र योग्य आहार आणि संतुलित दिनचर्या याद्वारे या समस्येवर नियंत्रण मिळवणे शक्य आहे, असे मत आहारतज्ज्ञ अंजली फाटक यांनी व्यक्त केले आहे. वजन कमी असणे किंवा जास्त असणे या दोन्ही गोष्टी फर्टिलिटीवर परिणाम करतात, त्यामुळे सकस आहार, पुरेशी झोप आणि तणावमुक्ती अत्यंत आवश्यक आहे.



**अन्न, फर्टिलिटी यांचा संबंध**

आपला आहार थेट हार्मोन्सचे संतुलन, स्त्रीबीज आणि शुक्राणूंच्या गुणवत्तेवर परिणाम करतो. असंतुलित आहारामुळे इन्सुलिन रेझिस्टन्स आणि सूज वाढते, ज्यामुळे महिलांमध्ये पीसीओएस आणि पुरुषांमध्ये शुक्राणूंची गुणवत्ता कमी होण्यासारख्या समस्या उद्भवतात.

**प्रजनन क्षमतेसाठी घातक घटक**

ट्रान्स फॅट : तळलेले पदार्थ आणि बेकरी उत्पादने.
हाय जीआय फूड्स : मैदा, पांढरा ब्रेड व शीतपेये.
व्यसने : अतिप्रमाणात कॅफिन, मद्यपान व धूम्रपान.
जीवनशैली : तणाव, निद्रानाश व असंतुलित वजन.

**काय काळजी घ्यावी?**

तज्ज्ञांच्या मते, केवळ आहारच नाही तर रोजचा व्यायाम, योग आणि ध्यानधारणा करणे गरजेचे आहे. शरीराला विश्रांती देण्यासाठी दररोज सात ते आठ तासांची झोप घेणे अनिवार्य आहे. वजन संतुलित ठेवल्यास हार्मोन्सचे संतुलन राखणे अधिक सोपे होते. यात महिलांसाठी पालेभाज्या, फळे, डाळिंब व संत्री, अक्रोड, जवस, जव, ओट्स, बाजरी, दूध व दही उपयुक्त असतात.

**संशोधनात काय म्हटले आहे?**

२०२५मध्ये झालेल्या एका मोठ्या संशोधनानुसार आहारात जंक फूड आणि हाय–इन्फ्लेमेटरी पदार्थांचा समावेश असल्यास वंध्यत्वाचा धोका दुपटीने वाढू शकतो. याउलट पोटाचे आरोग्य चांगले ठेवणारा आहार फर्टिलिटीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतो. पुरुषांनी विषेश काळजी घ्यावी. त्यांनी शुक्राणूंची निर्मिती व आरोग्य वाढवणारे पदार्थ जसे की, टोमॅटो, गाजर व रंगीत भाज्या, डाळी, पनीर खावेत.

# पालीमध्ये कचरा वर्गीकरण आवश्यक

## प्रशासनाने कार्यवाही करण्याची मागणी



**सुधागड : रामप्रहर वृत्त**

पाली शहरात कचरा वर्गीकरणाची योग्य व्यवस्था नसल्यामुळे साठवलेला कचरा सर्रास जाळला जातो. त्यामुळे निर्माण होणाऱ्या धुरामुळे वायू प्रदूषण वाढत असून सकाळी फिरायला जाणाऱ्या नागरिकांना श्वसनाचा त्रास, डोळ्यांची जळजळ यांसारख्या समस्या भेडसावत आहेत. नागरिकांच्या तक्रारी असूनही नगरपंचायत प्रशासन मात्र याकडे दुर्लक्ष करत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

वर्तमानपत्रांमध्येही वारंवार बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत की, जीसीपीद्वारे फक्त कचऱ्याचा ढिगारा ढकलला जातो किंवा थोडाफार स्वच्छतेचा दिखावा केला जातो, मात्र प्रत्यक्षात प्रदूषण रोखण्यासाठी ठोस उपाययोजना होत नाहीत. नागरिकांचा आरोप आहे की पाली नगरपंचायतीने या गंभीर समस्येकडे लक्ष देण्याऐवजी फक्त कागदोपत्री घोडे नाचवले जात आहेत.

नागरिकांनी स्पष्टपणे सांगितले आहे की या प्रदूषणाला जबाबदार पाली नगरपंचायतच आहे. कारण कचरा व्यवस्थापनाची जबाबदारी ही स्थानिक स्वराज्य संस्थेची असते. ओला-सुक्या कचऱ्याचे वर्गीकरण, पुनर्वापर आणि वैज्ञानिक पद्धतीने विल्हेवाट लावणे ही नगरपंचायतीची प्राथमिक जबाबदारी आहे, मात्र ती पार पाडली जात नसल्याने नागरिकांमध्ये संताप आहे.

नागरिकांनी मागणी केली आहे की साठवलेल्या कचऱ्याला आग लावण्यावर तातडीने बंदी घालावी, जबाबदार कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी, ओला-सुक्या कचऱ्याचे वर्गीकरण करून योग्य व्यवस्थापन करावे आणि प्रदूषण रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात. कारवाई म्हणजेच नगरपंचायतीने दोषींवर दंडात्मक कारवाई करणे, संबंधित कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करणे आणि प्रदूषण रोखण्यासाठी ठोस पावले उचलणे.

पाली नगरपंचायतीने या गंभीर समस्येकडे लक्ष देऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. अन्यथा नागरिकांना होणाऱ्या त्रासासाठी नगरपंचायतच जबाबदार धरली जाईल, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

## लाडकी बहीण योजनेंतर्गत ई-केवायसीची ३० एप्रिलपर्यंत संधी

**रायगड :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांनी e-KYC प्रक्रिया पूर्ण केली आहे. तथापि ही प्रक्रिया पूर्ण करताना लाभार्थ्यांच्या कुटुंबातील सदस्य नियमित/कायम कर्मचारी कंत्राटी कर्मचारी म्हणून सरकारी विभाग/ उपक्रम/मंडळ/भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत नसावा किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत आहे किंवा कसे याबाबतचा पर्याय निवडताना नजरचुकीने चुकीचा पर्याय निवडण्यात आलेला आहे, अशा लाभार्थी महिलांसाठीच ऑनलाईन मध्ये पुन्हा एकदा सुधारणा करण्याची संधी ३० एप्रिल २०२६ पर्यंत उपलब्ध करुन देण्यात आलेली असून याबाबत शासन परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे.


वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी राम प्रहर


### माथेरान गिरीस्थान नगरपरिषद

माथेरान, ता. कर्जत, जिल्हा रायगड. ४१०१०२,
ई-मेल आयडीः mcomatheran@gmail.com

**माथेरान नगर परिषद, माथेरान**
**जाहीर सूचना**

सर्वांना कळविण्यात येते की, माथेरान शहर परिसरामध्ये काही ठिकाणी बेघर व मोकाट गुरेढोरे फिरत असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या शहरी भागातील पशुधन ठेवणे व वाहतूक अधिनियम, १९७६ नुसार, शहरी भागात अनधिकृतरीत्या जनावरे ठेवणे व त्यांना मोकाट सोडणे हा दंडनीय प्रकार आहे. यामुळे नागरिकांना अडथळा निर्माण होतो तसेच अपघात होण्याची शक्यता वाढते.

तरी सर्व पशुपालकांना सूचित करण्यात येते की, त्यांनी आपली जनावरे मोकाट सोडू नयेत, जनावरांची योग्य ती देखभाल करावी. आवश्यक असल्यास जनावरांना गोशाळेत हलविण्याची व्यवस्था करावी. नगर परिषदेमार्फत लवकरच अशा मोकाट जनावरांविरुद्ध कारवाई करण्यात येईल. तसेच, इच्छुक संस्थेने / ट्रस्टने जनावरांच्या पुनर्वसनासाठी (गोशाळेत हलविणे, अन्न व निवारा व्यवस्था) करणेकामी इच्छुक असल्यास त्या कागदपत्रांसह ३ दिवसांच्या आत माथेरान नगरपरिषद कार्यालयाशी संपर्क साधावा.

**जावक क्र. मागिनपः १०२८:२०२६-२७**
**दिनांकः २७.०४.२०२६**
**स्थळः माथेरान**

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**माथेरान गिरीस्थान नगरपरिषद**

### जाहीर नोटीस

**तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे मोर्बे, तहसील- पनवेल, जिल्हा- रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार श्री बाबुराव पांडुरंग तातारे, यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे:-**

**शेतजमीनीचे वर्णन**

**मौजे मोर्बे, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील मे. दुय्यंम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.**

| गट कमांक व उपविभाग | क्षेत्र | | | आकार रु. पै |
|---|---|---|---|---|
| | लावणी लायक | पोटखराबा | एकुण क्षेत्र | |
| | हे. आर. प्रती | हे. आर. प्रती | हे. आर. प्रती | |
| २८/३/१/ब /३/२ | ०-८५-३० | ०-०६-६० | ०-९१-९० पैकी विकीदार यांच्या मालकीचे क्षेत्र ०-१८-०० | ६.४४ |

**वरील शेतजमीन/मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन ०७ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.**

ठिकाण : पनवेल
दिनांक : २७/०४/२०२६
**कार्यालयीन पत्ता**
गाळा क. १५४ महानगरपालीका कॉम्पलेक्स
तहसिलदार ऑफिस जवळ, दत्त झेरॉक्सच्या वरती,
ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६.
संपर्क:- ८८८८२७१७५९

**सही/-**
**ॲड. स्वप्निल व्यं जाधव**
**बी.ए.एल. बी**

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यांत येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मौजे कामोठे, तालुका पनवेल, जि.रायगड येथील सिडको प्लॉट **श्री.नथु पदु शेळके व इतर** यांचे मालकी हक्काची, ताबेकब्जातील मिळकती असून सदरची मिळकत आमचे अशिल **शक्ती बिल्डर्स डेव्हलपर्स** हे विकसीत करण्यासाठी घेत आहेत. तरी सदर मिळकतीचे करारनामा करण्यांचे आहेत. परिशिष्टात वर्णनात नमुद केलेल्या मिळकतीचे करारनामा करणार असल्याने या कारणासाठी जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहोत.

मिळकतीचे वर्णन
मौजे - कामोठे, तालुका - पनवेल, जिल्हा रायगड

| नोड | भुखंड कमांक | सेक्टर | क्षेत्र चौ .मी |
|---|---|---|---|
| कामोठे | ३४ | ५ | २५० |

तरी वरील सदरहू मिळकतीबाबत अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबध व अधिकार ताबाकब्जा, कुळवहिवाट, इजमेंट समझोता करार, साठेकरार, विक्रीविनीमय गहाण, बोजा, दान, पोटगी वारसाहक्क, ट्स्ट न्यास भाडेपटटा सबलिज, अंडरलिज वगैरे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत खालील सही करणार खरेदीदारांचे वकील यांचे खालील पत्त्यावर प्रथम दर्शनी पुराव्यासह , लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल करण्यांत याव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकती प्राप्त न झाल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकती संदर्भातील सर्व व्यवहारातील सर्व व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : २७/०४/२०२६

**सही/-**
**ॲड. कांचन एस. पाटील**
**बी.ए.एलएल.बी.**

पत्ता.:- ऑफिस नं २०१, दुसरा मजला, साई आर्केड, जी पी पारसिक बँकेवरती, लाईफ लाईन हास्पीटल जवळ पनवेल बस स्टॅन्ड समोर पनवेल जि, रायगड ४१० २०६ फोन नं. ८६८९८०९८९६ ८१०८८८२६११

### जाहीर सूचना

सर्व लोकास या जाहीर नोटीसीने असे कळवीण्यात येते की, मौजे वात, ता. खालापूर जिल्हा. रायगड येथील खालील प्रमाने हक्क नोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे आशिलांनी संबंधित कब्जेदार श्री. पुंडलिक खंडु म्हात्रे यांचेकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

| अ.क्र. | सर्व्हे नं | क्षेत्रफळ. हे आर चौ मी | आकार रूपये पैसे |
|---|---|---|---|
| १ | १४२ | ०-४१-७० पैकी विक्री क्षेत्रफळ ०-१६-०० | ७.९४ |

सबब सदर मिळकतीचा अगर कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज, तबदील, वारसा या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तकारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन चौदा (१४) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे खाली नमुद केलेल्या पत्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे कोणाचीही कसलीही हरकत अगर तकार आली नाही तर सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत व खरेदी घेणेस योग्य आहे असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तकारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहाणार नाहीत व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती, तक्रारी कायमच्या सोडुन दिल्या आहेत असे समजणेत येईल हे सर्व लोकांस कळावे.

दिनांक : २७/०४/२६
ठिकाण : रिस

sd/-
Adv.Sachin R Chalke
B.A LL.B

Office: 107, Gokul Nagari Building, 1st Floor, Village: Rees. Post. Mohopada, Tal- Khalapur, Dist-Raigad, Maharashtra, Pin No.410222. Mob:8180823040
Email:srchalke1979@gmail.com

### जाहीर सूचना

सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, मौजे अजिवली, ता. पनवेल, जि. रायगड येथील गट क्रमांक १९/२ मधील एकूण ११.७५ गुंठे क्षेत्रफळाची जमीन ही श्री. समीर बालकृष्ण बडे यांची वडिलोपार्जित व स्वतःच्या मालकीची आहे.

सदर जमिनीमध्ये इतर सह-भोगवटेदारांची नावे असून, त्यामध्ये मीना प्रमोद कोळेकर, वंदना जनार्दन जांभळे, सुनीता पांडुरंग परांडे, निलिमा नारायण बडे, यमुन पांडुरंग बडे, सचिन नारायण बडे, सुभाष नारायण बडे, सुविधा नारायण बडे, सुषमा नारायण बडे, रेखा नारायण बड़े इत्यादींचा समावेश आहे.

पक्ष क्रमांक १ (विक्रेता) यांनी वरील नमूद जमिनीतील आपला हिस्सा पक्ष क्रमांक २ (खरेदीदार) श्री. मुकेश उत्तम गायकवाड, रा. खारघर, ता. पनवेल, जि. रायगड यांना विक्री करण्याचा करार केला आहे.

तरी वरील नमूद जमिनीबाबत कोणत्याही व्यक्तीस हक्क, दावा, आक्षेप किंवा हरकत असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे. अन्यथा कोणताही दावा ग्राह्य धरला जाणार नाही व पुढील व्यवहार निर्विघ्नपणे पूर्ण करण्यात येईल.

दिनांक : २७/०४/२६
ठिकाण : कामोठे

**सही/-**
**ॲड. अविनाश गायकवाड**
**वकील मुंबई उच्च न्यायालय**

शॉप नं ०१ सिटीलाईट सी एच.एस.लि प्लॉट नं ५८/A
सेक्टर २१ कामोठे नवी मुंबई ४१०२०९


वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी राम प्रहर


### पनवेल महानगरपालिका

तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड

**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | श्री. देवेंद्र कुमार कानजीभाई वैद्य., प्लॉट नं.- २५ए, सेक्टर-९, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (प), ता. पनवेल, जि. रायगड | ०२ सोनमोहर झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील **प्लॉट नं.२५ए, सेक्टर-९, खांदा कॉलनी नवीन पनवेल (प), ता. पनवेल, जि. रायगड** येथे भूखंडाच्या बाहेरील ०२ झाडे प्रवेश द्वारामध्ये वाहने ये-जा करणेस बाधित होत आहे. |
| २ | श्री. सुरज नलावडे, २०४ए, न्यू बॉम्बे कमर्शियल कॉम्प्लेक्स, सेक्टर- ११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई. | ०३ उंबर, ०१ सप्तपर्णी व ०१ जंगली अशी एकूण ०५ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील **हानी होम्स को. ऑप. हौसिंग सोसायटी, प्लॉट नं.३४, सेक्टर-२०, खारघर, ता. पनवेल, जि.रायगड** येथे भूखंडाच्या आवारातील ०५ झाडे नवीन इमारतीच्या वॉल कंपाउंड बांधकामात बाधित होत आहे. |
| ३ | श्री.जी.हरी कृष्णा रेड्डी, प्लॉट नं-८१, सेक्टर-२०, खारघर, ता. पनवेल, जि. रायगड | ०१ कडूलिंब, ०१ सप्तपर्णी व ०१ विलायती चिंच अशी एकूण ०३ झाडे तोडणे व ०१ सप्तपर्णी झाड पुनर्रोपण अशी एकूण ०४ झाडे | पनवेल महानगरपालिका हद्दीतील **प्लॉट नं.-८१, सेक्टर - २०, खारघर, ता. पनवेल, जि. रायगड** येथे भूखंडाच्या आवारातील ०४ झाडे नवीन इमारत बांधकामात बाधित होत आहे. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची /पुनर्रोपण करणेस परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मूदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणी करणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२६/प्र.क्र.११८/१२९/२०२६
दिनांक : २७/०४/२०२६

**सही /-**
**उपायुक्त**
तथा वृक्ष अधिकार
पनवेल महानगरपालिका

### महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ११/२०२६-२०२७ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | रोहा औद्योगिक क्षेत्र... सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती... रोहा औद्योगिक क्षेत्रातील सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्रापासून आरे खुर्द गावापर्यंतच्या सांडपाणी निःसारण वाहिनीची वार्षिक तत्वावर देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ ३५,२४,७८६.०० |
| २ | नागोठाणे औद्योगिक क्षेत्र पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... एमआयडीसी जलशुद्धीकरण प्रकल्प नागोठाणे येथील पीएसी टाक्यांना एसीपीआरएस संरक्षक उपचार करणे . | ₹ ३९,०७,७९५.०० |
| ३ | रानसई पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... रानसई धरणावर स्वयंचलित हवामान केंद्राची तरतूद व स्थापना करणे. | ₹ ३९,८६,९००.०० |
| ४ | तळोजा औद्योगिक क्षेत्र सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती... तळोजा औद्योगिक क्षेत्रातील टप्पा क्र.२ मधील सांडपाणी उदंचन गृहाचे एक वर्षाच्या कालावधीकरीता परिचालन व देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ २३,४६,७२०.०० |
| ५ | नागोठाणे औद्योगिक क्षेत्र पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.... वारवताने गावात शुद्ध जल उर्ध्व वाहिनीला लागून पावसाळी गटर बांधणे. | ₹ ३९,९८,५०९.०० |
| ६ | पेण अलिबाग व नागोठाणे औद्योगिक क्षेत्र पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती......पेण अलिबाग व नागोठाणे येथील विविध ठिकाणी डिजिटल (हायब्रीड) प्रकारच्या ईपीएबीएक्सचा पुरवठा करून स्थापन करणे व चाचणी करून कार्यान्वित करणे. | ₹ ३३,३४,२१५.०० |
| ७ | तळोजा औद्योगिक क्षेत्रातील अग्निशमन केंद्राची देखभाल व दुरुस्ती ... तळोजा अग्निशमन केंद्रातील कार्यालय, कर्मचारी निवासी इमारतींच्या टेरेस स्लॅबला एचडीआरए संरक्षक कोटिंग करणे. | ₹ ३९,९१,६४५.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक २९/०४/२०२६ ते दिनांक १३/०५/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक ०४/०५/२०२६ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक ०७/०५/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

### महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**मुदतवाढ सूचना क्र. ३**

**ई निविदा सूचना क्र. ८६/२०२५-२०२६ (मुंबई) करीता**

दिनांक १६/०३/२०२६ रोजी दैनिक नवाकाळ, मुंबई, दैनिक फ्रिप्रेस जरनल, मुंबई, दैनिक हिंदुस्तान टाईम्स, मुंबई,दैनिक नवभारत, मुंबई, दैनिक खबरें आजतक, मुंबई, दैनिक जागरुक टाईम्स, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामांकरीता ई निविदा https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्धते बाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | तळोजा औद्योगिक क्षेत्र ... नावडे येथील लेव्हल क्रॉसिंग क्र. १२-ए वरील रोड ओव्हर ब्रिजच्या (आरओबी) दुरुस्तीची कामे करणे. | ₹ १७,४०,४६,१७५.०० |

उपरोक्त कामाबाबत निविदा प्रपत्र दिनांक ०६/०५/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

# सिडकोची साडेबारा टक्के योजना अंतिम टप्प्यात

## १.८६ टक्के क्षेत्राचे लवकरच होणार वाटप | उरण, पनवेल, नवी मुंबईमधील शेतकऱ्यांना दिलासा

**उरण : बातमीदार**

रायगड जिल्ह्यातील पनवेल, उरण आणि नवी मुंबई परिसरांतील शेतकऱ्यांच्या पुनर्वसनाशी निगडित सिडकोच्या साडेबारा टक्के योजनेने अखेर अंतिम टप्प्यात प्रवेश केला असून, एकूण भूखंड वाटपापैकी तब्बल ९८.१४ टक्के प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

सुमारे तीन दशकांहून अधिक काळ प्रलंबित राहिलेल्या या योजनेमुळे हजारो शेतकऱ्यांना हक्काची जमीन मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. उर्वरित १.८६ टक्के वाटप पुढील काही महिन्यांत पूर्ण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

राज्य सरकारनेही अधिवेशनात शेतकऱ्यांना लाभ लवकर देण्याच्या सूचना सिडकोला केल्याने प्रक्रियेला वेग आल्याचे चित्र आहे. दोन वर्षांच्या काळात चार संगणकीय सोडती काढणारे विजय सिंघल हे पहिले सिडको एमडी ठरले आहेत.

नवी मुंबई शहर उभारणीसाठी ठाणे जिल्ह्यातील २८, पनवेल तालुक्यातील ३८ आणि उरणमधील २९ अशा एकूण ९५ गावांतील जमिनी संपादित करण्यात आल्या होत्या. या प्रक्रियेत १२ हजार २६९ भूधारकांना ९०४.४२ हेक्टर क्षेत्र साडेबारा टक्के योजनेतून देणे अपेक्षित होते. त्यापैकी आतापर्यंत ८८७.६० हेक्टर क्षेत्राचे वाटप पूर्ण झाले आहे.



सिडकोने नऊ एप्रिल रोजी नऊ विविध नोडमधील एक लाख ११ हजार चौरस मीटर क्षेत्रासाठी संगणकीय सोडत जाहीर केली. उर्वरित १६.८२ हेक्टर क्षेत्राच्या वाटपासाठी लवकरच अंतिम सोडत काढण्यात येणार असून, त्यानंतर शिल्लक लाभार्थींना शेवटचे आवाहन करण्यात येणार आहे.

सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी या प्रक्रियेला गती देण्याच्या सूचना संबंधित विभागांना दिल्या आहेत.

दरम्यान, या योजनेच्या संथ गतीवरून विविध शेतकरी संघटनांकडून सातत्याने नाराजी व्यक्त होत होती. या पार्श्वभूमीवर शासनाच्या सूचनांनंतर आणि प्रशासनाच्या सक्रिय भूमिकेमुळे आता वाटप प्रक्रियेला गती मिळाली आहे.लवकरच या सर्व प्रकियेमुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.साडेबारा टक्केचे लाभार्थी हे पनवेल उरण व नवी मुंबई मधील असल्यामुळे या भागातील शेतकऱ्यांना याचा मोठया प्रमाणात फायदा होणार आहे.

**अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेला विषय संचालक मंडळाच्या मान्यतेने निकाली काढण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. आता जे काही लाभार्थी लाभापासून अजूनही वंचित असतील, त्यांनाही लवकरात लवकर योजनेचा लाभ देऊन १२.५ टक्के योजना संपल्याचे जाहीर करून तसा अनुपालन अहवाल शासनाला सादर करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे.**

**–गणेश देशमुख,**
सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको.

# उरण महाविद्यालयात संशोधन कार्यशाळा

**उरण : बातमीदार**

महाविद्यालयांमध्ये संशोधन पद्धती आणि संशोधनासाठी वित्तीय स्त्रोत या विषयी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे व्याख्याते म्हणून डॉ. विलास गायकर सी.एच.एम.कॉलेज उल्हासनगर हे उपस्थित होते.

त्यांनी संशोधन पद्धती, संशोधन प्रक्रिया, कृत्रिम बुद्धिमत्ता, संशोधनाचे टप्पे , गृहीतके, संशोधक, माहिती गोळा करण्याच्या पद्धती, संशोधन लेखन, प्रकाशन, वित्तीय स्त्रोत इत्यादी विषयांवर महाविद्यालयातील पदव्युत्तर विभाग एम ए आणि एम कॉम तसेच सर्व शिक्षक, संशोधक यांना मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जे यांनी उपस्थित वर्गास मार्गदर्शन केले. आज संशोधन अतिशय महत्त्वाचे आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने उत्तम संशोधन कार्य करावे आणि देशातील तसेच परदेशातील संशोधनात्मक संधीचा फायदा घ्यावा, असे यावेळी प्राचार्यांनी संबोधित केले.



प्रा. इंदुरकर सर यांनी मत व्यक्त करताना सांगितले की, अशा प्रकारचे मार्गदर्शन आम्ही महाविद्यालयात शिकत होतो तेव्हा कृत्रिम बुद्धिमत्ते सारखे ज्ञान मिळत नव्हते, परंतु आज विद्यार्थ्यांना उत्तम संधी आहेत. प्रस्तुत कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या शंका, प्रश्न विचारून उत्तम प्रकारे सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांना अमूल्य असा ज्ञानाचा खजिना या कार्यक्रमातून मिळाला.

सदर ज्ञानाच्या विनियोग विद्यार्थी आपल्या पुढील प्रगतीसाठी करतील असे मत डॉ. पराग कारुळकर यांनी व्यक्त केले. डॉ. अरुण चव्हाण यांनी आभार मानले.

# सीकेटी विद्यालयाच्या कब बुलबुल युनिटची नेत्रदीपक कामगिरी ; मान्यवरांकडून कौतुक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालय, इंग्रजी माध्यम, प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी रायगड भारत स्काऊटस् आणि गाईडस् पेण-रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडलेल्या 'खरी कमाई' सेवांतर्गत जास्तीत जास्त कमाई करून सामाजिक हातभार लावून संपूर्ण रायगड जिल्ह्यात शाळेचा लौकिक वाढवला.







या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबन, प्रामाणिकपणा आणि कामाची आवड निर्माण करणे असून ह्या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी विविध कौशल्यांचा उपयोग केला. त्याचबरोबर, विद्यार्थ्यांनी घरातील व शेजारील थोरा मोठ्यांना मदत करून त्यांच्या कडून मोबदला मिळवून त्यांचा आशीर्वाद मिळविला.

या उपक्रमात विद्यार्थ्यांनी केवळ आर्थिक कमाईच केली नाही, तर वेळेचे व्यवस्थापन, टीमवर्क आणि जबाबदारीची जाणीवही आत्मसात केली. "खरीकमाई" हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरला. या यशामुळे शाळेचे नाव परिसरात उंचावले असून इतर शाळांसाठीही हा उपक्रम प्रेरणादायी ठरला.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल प्रत्येक पालकांनी आनंद व्यक्त करत भविष्यातही अशा उपक्रमांमध्ये अधिकाधिक सहभाग घेण्याचे आवाहन करण्यात आले. दरम्यान, चांगू काना ठाकूर विद्यालयाच्या नावलौकिकात भर घालणाऱ्या विद्यार्थ्यांचे त्याचबरोबर कब बुलबुल मार्गदर्शक शिक्षक सुरेंद्र ठमके आणि सर्व शिक्षकांचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि जे. बी.एस.पी.संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या सदस्या वर्षा ठाकूर यांनी विशेष कौतुक केले.

आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाइस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव डॉ.एस.टी. गडदे, संस्थेचे सर्व पदाधिकारी, इंग्रजी माध्यमाच्या पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, त्याबरोबर शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# ज्ञानभारत प्रकल्पांतर्गत राष्ट्रीय हस्तलिखित सर्वेक्षण मोहीम ; मोबाईल ॲपद्वारे नोंदणीची सुविधा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

भारतातील समृद्ध हस्तलिखित वारशाचे संवर्धन, दस्तऐवजीकरण व डिजिटायझेशन करण्याच्या उद्देशाने भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाच्या वतीने 'ज्ञानभारत (Gyan Bharatam)' या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत राष्ट्रीय हस्तलिखित सर्वेक्षण मोहीम १६ मार्च २०२६ पासून सुरू करण्यात आली आहे. देशभर विखुरलेल्या हस्तलिखितांचा शोध घेऊन त्यांची नोंदणी, जतन व प्रसार करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या या उपक्रमांतर्गत देशातील शैक्षणिक संस्था, संशोधन संस्था, ग्रंथालये, धार्मिक संस्था तसेच खाजगी संग्राहक यांच्या सहकार्याने एक कोटीहून अधिक हस्तलिखितांचा शोध व नोंदणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या हस्तलिखितांचा राष्ट्रीय डिजिटल संग्रह (National Digital Repository) तयार करून त्याचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसारण करण्याचा या योजनेचा हेतू आहे. हस्तलिखितांची मालकी संबंधित संस्था किंवा संग्राहक यांच्याकडेच राहणार असून आवश्यकतेनुसार त्यांचे डिजिटायझेशन करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्यात या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, नागपूर व भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था, पुणे ही क्लस्टर केंद्रे तर आनंद आश्रम, पुणे आणि भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे ही स्वतंत्र केंद्रे म्हणून कार्यरत राहणार आहेत. राज्यासाठी पुस्तकालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची राज्य नोडल संस्था म्हणून नियुक्ती करण्यात आली असून राज्य नोडल अधिकारी म्हणून श्री. मुजिबकुमार जंगले, संचालक, पुस्तकालय संचालनालय कार्य पाहत आहेत. तसेच श्रीमती अंजली सोमक, उपसंचालक, मराठी भाषा विकास संस्था या सहनोडल अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

या सर्वेक्षण मोहिमेसाठी 'Gyan Bharatam' हे मोबाईल ॲप विकसित करण्यात आले असून त्याद्वारे हस्तलिखितांची नोंदणी, क्षेत्रीय मूल्यांकन, पडताळणी व दस्तऐवजीकरणाची प्रक्रिया सुलभ करण्यात आली आहे. हे मोबाईल ॲप Android व iOS या दोन्ही प्लॅटफॉर्मवर उपलब्ध असून नागरिकांना www.gyanbharatam.com या संकेतस्थळावरूनही माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच या संदर्भातील सविस्तर मार्गदर्शक (User Manual) देखील उपलब्ध करून देण्यात आला आहे.

जिल्हास्तरावर जिल्हा नोडल अधिकारी नियुक्त करणे, जिल्हास्तरीय समिती स्थापन करणे तसेच मंदिरे, मठ, धार्मिक संस्था, विद्यापीठे, ग्रंथालये, शैक्षणिक संस्था व खाजगी संग्राहक यांना सर्वेक्षणात सहभागी करून घेण्याबाबत संबंधितांना निर्देश देण्यात आले आहेत. या मोहिमेत शैक्षणिक संस्था, ग्रंथालये, संग्रहालये, संस्कृत पाठशाळा, धार्मिक संस्था, संशोधक, पारंपरिक पंडित तसेच NCC, NSS स्वयंसेवक व विद्यार्थी यांच्या सक्रिय सहभागाचे आवाहन करण्यात आले आहे. आपल्याकडे कोणतीही हस्तलिखिते उपलब्ध असल्यास त्यांची माहिती 'Gyan Bharatam' या मोबाईल ॲपद्वारे अपलोड करून या राष्ट्रीय कार्यात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन अपर आयुक्त (सामान्य प्रशासन), कोकण विभाग, नवी मुंबई यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# जलतरणात विद्यार्थ्यांची आत्मविश्वासपूर्ण कामगिरी

**नवी मुंबई : बातमीदार**

घणसोली सेक्टर-३ येथील सेंट्रल पार्कमधील सुसज्ज जलतरण तलावात नवी मुंबई महानगरपालिकेच्या शाळा क्रमांक ९३ च्या विद्यार्थ्यांसाठी जलतरण चाचणीचा (स्विमिंग ट्रायल) उत्साहवर्धक उपक्रम पार पडला. शाळेच्या क्रीडा विकासाच्या दृष्टीने आयोजित या उपक्रमात २७ विद्यार्थ्यांनी जलतरणाची भीती झुगारून आत्मविश्वासाने सहभाग नोंदवला.



या चाचणीचे विशेष म्हणजे अनेक विद्यार्थ्यांसाठी हा पहिलाच जलतरणाचा अनुभव होता. सुरुवातीला त्यांच्या चेहऱ्यावर दिसणारी भीती काही क्षणांतच आनंद, धैर्य आणि जिद्दीमध्ये परिवर्तित झाली. प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या क्षमतेनुसार उत्कृष्ट कामगिरी करण्याचा प्रयत्न केला. यावेळी, क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव यांनी विद्यार्थ्यांना तांत्रिक मार्गदर्शन करत त्यांच्या सुप्त गुणांना वाव दिला.

तसेच मुख्याध्यापिका डायना इसाबेल, उपमुख्याध्यापक निलेश वाधवा आणि शालेय प्रशिक्षक रश्मी चैनानी यांनी उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मोलाची भूमिका बजावली. प्रशिक्षक सुधाकर आलदर यांनी जलतरणातील बारकावे समजावून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना जलतरणाबरोबरच शिस्त, धैर्य, आत्मविश्वास आणि स्पर्धात्मक वृत्तीचे महत्त्वही समजले.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांचा मोठा हातभार लागतो, असे मत व्यक्त करण्यात आले. या जलतरण चाचणीमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत लकी निशाद, शौर्य अभिजित, लकीश निशाद, दक्ष नाईक, श्रीश बांद्रे आणि प्रसन्ना मुले यांची पुढील प्रशिक्षणासाठी निवड करण्यात आली. त्यांच्या यशामुळे शाळेचा गौरव वाढला असून ते इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्थान ठरत आहेत. दरम्यान, निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले तसेच सहभागी प्रत्येक विद्यार्थ्याचे विशेष कौतुक करण्यात आले.

# उरण येथील कोकण ज्ञानपीठ महाविद्यालयात रक्तदान शिबिर




**उरण : प्रतिनिधी**

रक्ता अभावी कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू होऊ नये तसेच गरीब – गरजू रुग्णांना वेळेत रक्त पुरवठा उपलब्ध व्हावा हा मानवतावादी दृष्टिकोन समोर ठेवून सद्‌गगुरु श्री अनिरुद्ध उपासना केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने कोकण ज्ञानपीठ वाणिज्य व कला महाविद्यालय उरण, पोलिस ठाण्यासमोर समोर उरण शहर येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी १९२ रक्तदात्यांची नोंदणी करण्यात आली होती. त्यापैकी १८२ रक्तदात्यांनी स्वतः पुढे येऊन रक्तदान करण्याचे योगदान दिले.

रक्तदानाविषयी जनजागृती करत आयोजित केलेल्या या रक्तदान शिबिराला उरण तालुक्यातील नागरिकांचा, उत्तम प्रतिसाद लाभला आहे. उरण तालुक्यातील अनिरुद्ध उपासना केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने उरणमध्ये दरवर्षी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते.

अनिरुद्ध अकॅडमी डिझास्टर मॅनेजमेंटच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केलेल्या या रक्तदान शिबिराला सद्‌गुगुरु रक्त पेढी कोपरखैरणे यांचे महत्वाचे सहकार्य लाभले. रक्तदान शिबिर उरण तालुक्यातील बहुसंख्य अनिरुद्ध बापू भक्तांनी विशेष मेहनत घेतली.

# कुबेर हेल्थ फाउंडेशनचा शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सामाजिक आरोग्य, जनजागृती आणि सेवाभावी कार्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या कुबेर हेल्थ फाउंडेशनचा भव्य शुभारंभ आज सुरुची हॉटेल, पनवेल येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील सहा मान्यवरांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. अशोकराव मोटे (जिल्हा सचिव, उत्तर रायगड भाजप) यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अँड. प्रतिभा भोईर (नगरसेविका, पनवेल महानगरपालिका), इंद्रेश साहू (महाराष्ट्र अवजड वाहतूक सेना उपाध्यक्ष, शिवसेना शिंदे गट), प्रतीक सूर्यवंशी (प्रशासक, एमजीएम हॉस्पिटल), संजय वाघमोडे (विभागीय वन अधिकारी) आणि संतोष ठाकूर (ग्रामसंवर्धन सामाजिक संस्था, तारा पनवेल) उपस्थित होते.

उपस्थित सर्व मान्यवरांनी विविध क्षेत्रातील अनुभवातून मोलाचे मार्गदर्शन करत आरोग्यसेवा, समाजकार्य आणि मानवसेवेचे महत्त्व पटवून दिले.



त्यांच्या प्रेरणादायी विचारांना उपस्थित नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी कुबेर हेल्थ फाउंडेशनच्या माध्यमातून भविष्यात राबविण्यात येणाऱ्या आरोग्यविषयक व सेवाभावी उपक्रमांची माहिती देण्यात आली. समाजातील गरजू घटकांसाठी कार्य करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

या कार्यक्रमाला कुबेर हेल्थ फाउंडेशनचे अध्यक्ष उत्तम दादासो शिंगाडे, उपाध्यक्ष शंकर गेजगे, सचिव प्रज्वल शिंगाडे, उपसचिव रंजना कांबळे, खजिनदार सचिन हातेकर, सदस्य दीपक सरवदे, सल्लागार अनिता हंडे, सुनंदा मोटे तसेच संस्थेचे आधारस्तंभ अशोकराव मोटे आणि उल्हास वाघमोडे यांची उपस्थिती लाभली.

फाउंडेशनचे अध्यक्ष उत्तम शिंगाडे यांनी उपस्थित मान्यवर आणि नागरिकांचे आभार मानून समाजसेवेच्या या उपक्रमाला सर्वांनी साथ द्यावी, असे आवाहन केले. मान्यवरांचे प्रभावी मार्गदर्शन आणि उत्साहपूर्ण वातावरणामुळे कार्यक्रम यशस्वी ठरला. "सेवा हीच खरी संपत्ती" या विचाराने कुबेर हेल्थ फाउंडेशनने समाजकार्यासाठी नवे पाऊल टाकल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# 'विद्याभवन'च्या १० विद्यार्थ्यांची एनएमएमएस शिष्यवृत्तीसाठी निवड

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

पुणे विद्यार्थीगृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलाच्या माध्यमिक मराठी विभागातील १० विद्यार्थ्यांनी नॅशनल मिन्स कम मेरिट स्कॉलरशिप परीक्षेत उत्कृष्ट गुण मिळवून ठाणे जिल्ह्यातून गुणवत्ता यादीत स्थान पटकावले.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेद्‌वारे आयोजित राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती योजना (एनएमएमएस) परीक्षा इयत्ता आठवीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना देता येते. डिसेंबरमध्ये महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने घेण्यात आलेल्या एनएमएमएस परीक्षेच्या निकालामध्ये सतरा विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यापैकी दहा विद्यार्थ्यांनी गुणवत्ता निवड यादीत स्थान मिळवले.

या शिष्यवृत्ती प्राप्त प्रत्येक विद्यार्थ्याला शासनातर्फे इयत्ता नववी ते बारावी पर्यंत दरवर्षी १२ हजार रुपयांप्रमाणे एकूण रुपये ४८ हजार शिष्यवृत्ती मिळणार आहे.

विभूती दत्तात्रय गुंजाळ, वेदश्री विश्वनाथ राक्षे, तन्वी संजय मस्कर, अथर्व अनिल गायकवाड, अथर्व विनेश पवार, अनुष्का आशिष गोळे, अनुष्का अरुण तिकोणे, धनंजय किरण जाधव, भूमिका त्रिंबक जाधव, सार्थक विनोद पवार या विद्यार्थ्यांची परीक्षेतील गुणांनुसार ठाणे जिल्ह्यातून शिष्यवृत्तीसाठी निवड झाली.

पुणे विद्यार्थी गृह कार्याध्यक्ष राजेंद्र बोऱ्हाडे, कुलसचिव दिनेश मिसाळ, माजी कार्याध्यक्ष प्रा.कृ.ना. शिरकांडे, सर्व पदाधिकारी व संचालक मंडळ तसेच शाळेचे मुख्याध्यापक गोरख कदम, श्रीजा नायर, मनीषा मुळीक, सुवर्णा मिसाळ, पर्यवेक्षिका शोभा लवटे, अस्मिता सलगर तसेच सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि पालकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



# रेवदंडा बाजारपेठेत पार्किंगचा अभाव

## असुविधेमुळे वाहतूक कोंडी समस्या नित्याचीच

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा बाजारपेठेत बेशिस्तीने केलेल्या लहान मोठ्या वाहनांच्या पार्किंगमुळे नित्याने वाहतूक कोंडी निर्माण होते. पार्किंगच्या असुविधेने रेवदंडा बाजारपेठेतील वाहतूक कोंडीची समस्या नेहमी ऐरणीवर असते.



अलिबाग, मुरूड व रोहा तालुक्याला रेवदंडा हे मध्यवर्ती ठिकाण असल्याने येथून वाहनांची जा-ये मोठया प्रमाणात आहे. विशेषतः मुरूड तालुका पर्यटनक्षेत्र म्हणून प्रसिध्दीस असल्याने येथून पर्यटक मोठया प्रमाणात येत असतात. त्यांना रेवदंडामार्गेच मुरूडकडे जा-ये करावी लागते. रेवदंडा बाजारपेठ सुमारे दोन किमी अंतरामध्ये वसलेली आहे. या बाजारपेठेतील रस्ता अत्यंत अरूंद आहे. त्यामुळे वाढत्या वाहतुकीचा ताण रेवदंडा बाजारपेठेतील अरूंद रस्ताला नेहमीच असतो. बाजारपेठेतील अगोदरच अरूंद असलेल्या रस्ता वाहनांची जा-ये करताना नित्याने वाहने व प्रवासीवर्गाला वाहतुक कोडींच्या समस्येला सामोरे जावे लागते. विशेष म्हणजे बाजारपेठेतील अरूंद रस्त्याला कुठेही पार्किंग सुविधा नसल्याने जा-ये करणारा वाहनांना बाजारपेठेत बेशिस्तीने पार्किंग केलेल्या वाहनाचा अडथळा होतो व वाहतूक कोंडी निर्माण होते.

रेवदंडा बाजारपेठेत अलिबाग, मुरूड व रोहा तालुक्यातील गावे व रेवदंडा पंचक्रोशीतील गावे अवलंबून आहेत. त्यामुळे रेवदंडा बाजारपेठ नित्याने गर्दीचे ठिकाण आहे. येथे बाजारपेठेत खरेदीसाठी नित्याची गर्दी असते. बाजारपेठेतील अरूंद रस्त्यात मोटरसायकल, रिक्षा, मालवाहतूक टेम्पो तसेच लहान मोठी वाहने बेशिस्तीने पार्किंग केली जातात. त्यामुळे बाजारपेठेतील अरूंद रस्त्याने जा-ये करणाऱ्या मोठया बसेस, मालवाहतूक ट्रक यांना अडथळा निर्माण होतो. त्यामुळे वाहतूक कोंडी नित्याने होते. मुख्यः रस्ता अरूंद असल्याने पार्किंग समस्यासुध्दा निश्चितच जाणवते. बाजारपेठेतील अरूंद रस्तात पार्किंग सुविधा उपलब्ध होत नसल्याने बाजारपेठेत गर्दीच्या वेळी रस्त्यात वाहतुकीची कोंडी निर्माण होते.

रेवदंडा बाजारपेठेत रस्त्याने मिनिटागणिक वाहने जा-ये करत असल्याने बेशिस्तीने केलेल्या पार्किंगने वाहतूक कोंडी निर्माण होते. रेवदंडा गोळा स्टॉप ते रेवदंडा हायस्कूलदरम्यान नित्याने वाहतूक कोंडीची समस्या असते. विशेषतः केळकर स्टॉप, अर्बन बँक, पारनाका, ते पुढे रेवदंडा हायस्कूलपर्यंत नित्याची वाहतूक कोंडी निर्माण होत असते. रेवदंडा बाजारपेठेतील गोळा स्टॉप ते रेवदंडा हायस्कूल या एक किमी अरूंद रस्त्याच्या अंतरामध्ये कुठेही पार्किंग सुविधा नसल्याने ही वाहतूक समस्या निर्माण होते.

रेवदंडा बाजारपेठेतील अरूंद असलेल्या रस्त्याला पार्किंग सुविधा नसल्यानेच वाहतूक कोंडी होत असल्याचे निदर्शनास येते. बाजारपेठेत खरेदीसाठी मोटरसायकल, रिक्षा, मालवाहतूक टेम्पो तसेच लहान मोठी वाहने येत असतात. त्यांना पार्किंग सुविधा अत्यंत गरजेची आहे. पार्किंग सुविधा नसल्याने बेशिस्तीने वाहने पार्किंग करून ठेवल्याने वाहतूक कोंडी निर्माण होते. बाजारपेठेतील नित्याने होत असलेल्या कोंडीने पोलिसांनासुद्धा डोकेदुखी ठरते. नित्याने येथे ट्रॅफिक पोलिसांची नित्यांत आवश्यकता असते. या ट्रॅफिक पोलिसांना रस्त्यात बेशिस्तीने पार्किंग केलेली वाहने हटवावी लागतात, त्यावेळी वाहतुक कोंडी सुटते, मात्र तोपर्यंत वाहनांची भली मोठी रांग बाजारपेठेत लागलेली दिसते. रोज व नित्याने रेवदंडा बाजारपेठेत होणारी वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी संबंधितांनी पार्किंग सुविधेचा प्रश्न सोडविणे फारच गरजेचे आहे.

# आजच्या डिजिटल काळात आर्थिक साक्षरता काळाची गरज -जिल्हाधिकारी

**रायगड : रामप्रहर वृत्त**

आजच्या डिजिटल युगात आर्थिक साक्षरता आणि आर्थिक शिस्त ही काळाची गरज बनली असून प्रत्येक नागरिकाने उत्पन्नाचे योग्य नियोजन, खर्चावर नियंत्रण, गुंतवणुकीचे भान आणि कर्जाचे जबाबदारीने व्यवस्थापन करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले.

Reserve Bank of India, Mumbai आणि जिल्ह्याची अग्रणी बँक Bank of India यांच्या संयुक्त विद्यमाने २४ एप्रिल रोजी प्राथमिक शिक्षकांसाठी आयोजित Training of Trainers (ToT) कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

या कार्यक्रमास जिल्हा परिषद रायगड यांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, शिक्षणाधिकारी ललिता दहीतुले, उपशिक्षणाधिकारी संतोष शेडगे, रिझर्व्ह बँकेच्या उपमहाप्रबंधक डॉ. ज्योती सक्सेना, बँक ऑफ इंडिया रायगड विभाग प्रमुख दीपनविता सहानी, उपविभागीय प्रमुख भारत सहाय, जिल्हा अग्रणी प्रबंधक विजयकुमार कुलकर्णी तसेच रिझर्व्ह बँकेचे रायगड जिल्हा अधिकारी विशाल गोंडखे, बेंजामिन डिकोस्टा, विविध शाळांतील शिक्षक, शिक्षण विभागाचे अधिकारी आणि बँकिंग क्षेत्रातील प्रतिनिधी उपस्थित होते.

मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी जावळे यांनी सांगितले की, आर्थिक शिस्त ही केवळ बचतीपुरती मर्यादित नसून उत्पन्नाचे नियोजन, खर्चावर नियंत्रण, योग्य गुंतवणूक आणि कर्ज व्यवस्थापन या सर्व बाबींचा त्यामध्ये समावेश होतो. बदलत्या आर्थिक परिस्थितीत प्रत्येक नागरिकाने आर्थिकदृष्ट्या सजग राहणे अत्यावश्यक आहे. विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासून आर्थिक साक्षरतेची जाणीव निर्माण करण्यात शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून बचतीचे महत्त्व, बँकिंग व्यवहार आणि विविध शासकीय योजनांची माहिती विद्यार्थ्यांना दिल्यास भविष्यात जबाबदार नागरिक घडण्यास मदत होईल.

यावेळी त्यांनी केंद्र व राज्य शासनाच्या विविध आर्थिक समावेशन योजनांचा उल्लेख करून Pradhan Mantri Jan Dhan Yojana, विमा योजना, पेन्शन योजना आणि डिजिटल व्यवहारांचा व्यापक प्रसार करण्याचे आवाहन केले. तसेच डिजिटल व्यवहार करताना सायबर सुरक्षिततेचे नियम पाळणे अत्यंत गरजेचे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे उद्दिष्ट स्पष्ट करताना रिझर्व्ह बँकेच्या उपमहाप्रबंधक डॉ. ज्योती सक्सेना यांनी सांगितले की, या प्रशिक्षणाद्वारे शिक्षकांना बँकिंग व्यवहारांचे ज्ञान, डिजिटल फसवणूक टाळण्यासाठी आवश्यक खबरदारी तसेच रिझर्व्ह बँकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती देऊन आर्थिक साक्षरतेत सक्षम करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. शिक्षक विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावत असल्याने शालेय शिक्षणाबरोबर आर्थिक साक्षरतेचे ज्ञान दिल्यास पुढील पिढी आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले. या प्रशिक्षणामध्ये रिझर्व्ह बँकेविषयी माहिती, ग्राहकांच्या ठेव रकमेबाबत डीआयसीजीसी (DICGC) संदर्भातील माहिती, डिजिटल फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी तसेच खऱ्या नोटा ओळखण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

सूत्रसंचालन रिझर्व्ह बँकेचे अधिकारी विशाल गोंडखे यांनी केले, तर जिल्हा अग्रणी प्रबंधक विजयकुमार कुलकर्णी यांनी उपस्थितांचे आभार मानले. शिक्षणाधिकारी ललिता दहीतुले व उपशिक्षणाधिकारी संतोष शेडगे यांचे सहकार्य लाभले. प्रशिक्षित शिक्षकांच्या माध्यमातून उर्वरित शिक्षकांसाठी जिल्हाभर अशा प्रकारचे कार्यक्रम आयोजित करून संपूर्ण जिल्हा आर्थिकदृष्ट्या साक्षर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी यांनी यावेळी दिल्या.



# माणगावमधील आठ ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणुकीसाठी आज मतदान प्रक्रिया

**माणगाव : प्रतिनिधी**

राज्यात ग्रामपंचायतींमधील सदस्य, थेट सरपंच यांच्या निधन, राजीनामा, अनहर्ता किंवा इतर अन्य कारणांमुळे रिक्त झालेल्या जागांच्या पोटनिवडणुकांसाठी पारंपारिक पद्धतीने राबविण्यात येणारा निवडणूक कार्यक्रम राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार निवडणूक आयोगाने जाहीर केला आहे. त्या अनुषंगाने माणगाव तालुक्यातील १६ ग्रामपंचायतींसाठी पोटनिवडणूक जाहीर करण्यात आली होती. त्यापैकी आठ ग्रामपंचायतींची पोटनिवडणूक बिनविरोध झाली असून उर्वरित आठ ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणुकीसाठी मंगळवार, २८ एप्रिल रोजी सकाळी ७.३० वाजल्यापासून ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत मतदान घेण्यात येणार आहे.

पळसप ग्रामपंचायतीच्या पोटनिवडणुकीत थेट सरपंच पदाची निवडणूक गाव पातळीवर बिनविरोध करण्यात आली असून सरपंचपदी वसंत बाबाजी कदम हे बिनविरोध निवडून आले असून अंबर्ले ग्रामपंचायत पोटनिवडणुकीत सदस्यपदी अनिता हरिश्चंद्र महाबळे, दहिवली तर्फे गोवेले ग्रामपंचायतीत जहिदा दाऊद मापकर व झहिरा फैजल गालसूलकर, वडवली ग्रामपंचायतीत निशा किर्ती जाधव, गांगवली ग्रामपंचायतीत समृद्धी शशिकांत मोरे, नांदवी ग्रामपंचायतीत राजेश शंकर म्हाप्रळकर, गोवेले ग्रामपंचायतीत गणेश लक्ष्मण गोविलकर हे बिनविरोध निवडून आले आहेत.

टोळखूर्द ग्रामपंचायतीत थेट सरपंचपदासाठी आज मतदान होत असून उर्वरित काकल, पहेल, हरकोल, विहूले, कुमशेत, शिरवली तर्फे निजामपूर, देगाव, वणीमलईकोंड या आठ ग्रामपंचायतींची पोटनिवडणूक कडेकोट पोलीस बंदोबस्तात मतदान होणार आहे. या मतदानाची मतमोजणी २९ एप्रिल रोजी होणार आहे. याकरिता तालुक्यातील ग्रामीण भागातील विविध पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांची लगबग सुरू असून तालुक्यातील निवडणूक असलेल्या त्या-त्या ग्रामपंचायत चोख पोलीस बंदोबस्त तैनात ठेवण्यात आला आहे.

# मनसे संपर्क अध्यक्षांचा दौरा

**धाटाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पक्षाच्या पुनर्बांधणीसाठी सर्व जिल्ह्यांसाठी नव्याने संपर्क अध्यक्षांची नेमणूक केली आहे. त्याच अनुषंगाने रायगड जिल्ह्याची जबाबदारी संदीप देशपांडे, सरचिटणीस योगेश परुळेकर आणि राजेश येरुणकर यांच्याकडे सोपविण्यात आली आहे.

२८ व २९ एप्रिल रोजी श्रीवर्धन, म्हसळा, तळा, रोहा आणि माणगाव तालुकानिहाय दौरा आखण्यात आला आहे. या दौऱ्यात स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांना भेटून जिल्ह्यातील पक्षाचा संघटनात्मक परिस्थितीचा आढावा परुळेकर व येरुणकर घेणार आहेत.

# अमृत वर्गामध्ये येणाऱ्या मुलांसाठी पाठांतर स्पर्धा

**रायगड : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) अलिबाग आणि उद्यम सखी संस्था अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने रामजी देवस्थान, रामनाथ, वरसोली अलिबाग येथे ६ ते १० आणी ११ ते १८ या वयोगटातील अमृत वर्गामध्ये येणाऱ्या मुलांसाठी एक पाठांतर स्पर्धा आयोजित केली होती.

स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून अनघा मराठे, जान्हवी पाटील, प्रणिता म्हात्रे यांनी काम पाहिले. मुलांमध्ये भारतीय संस्कृतीच्या, हिंदू धर्माच्या, भारतीय राष्ट्रीयत्वाच्या संस्कारांची रुजवात होणं व त्यांचं संवर्धन होणं, त्याचबरोबर ईशभक्ति निर्माण होणं यासाठी अमृत संस्था गेल्या काही महिन्यांपासून मुलामुलींच्या संघटनासाठी प्रयत्नशील असून नियमितपणे त्यांच्यात परस्पर सामंजस्य, सलोखा, सहकार्य निर्माण होण्यासाठी काही बैठे/मैदानी खेळ, स्तोत्रपठण इ.कार्यक्रम राबवत असते.

या स्पर्धेत अमृतचे शैलेश मराठे यांनी पुढाकार घेतला होता तसंच उद्यम सखी संस्था अलिबाग यांच्या प्रार्थना दामले-नागवेकर अलिबाग यांनी त्यांना आवश्यक ते सर्व सहकार्य उदार मनानं दिलं. रामजी देवस्थानच्या विश्वस्तांनीसुद्धा मोठ्या आपलेपणानं या कार्यक्रमासाठी जागा उपलब्ध करून दिली. अधिक माहितीसाठी शैलेश मराठे (९११२२२८७५९), मंगेश ढेबे (८१४९५५२१४३) संकेतस्थळ https://mahaamrut.org.in/ यांच्याशी संपर्क साधावा.

# डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त पुरस्कार, गौरव समारंभ

**खोपोली : प्रतिनिधी**

आरपीआय (आठवले गट) यशवंतनगर आणि शिळफाटा येथील ग्रामस्थांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक संयुक्त जयंती महोत्सव अत्यंत दिमाखात आणि उत्साही वातावरणात झाला. यावेळी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते मान्यवरांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.






या कार्यक्रमास आमदार महेंद्र थोरवे, संजय सिन्हा उपाध्यक्ष आरपीआय, नरेंद्र गायकवाड रायगड जिल्हाध्यक्ष आरपीआय, प्रमोद महाडिक जिल्हा युवक अध्यक्ष आरपीआय, नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, उपनगराध्यक्ष विक्रम साबळे आदी उपस्थित होते.

यावेळी मंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, अनिल सानप बांधकाम सभापती, अमित फाळे शिक्षण सभापती, प्रतीक्षा रेटवरेकर नियोजन सभापती, हरिश काळे नगरसेवक, अनिता पवार नगरसेविका, उज्वला महाडिक नगरसेविका, हर्षदा गायकवाड नगरसेविका यांचा सन्मान करण्यात आला. त्याचप्रमाणे राजाबापू सगळगिळे निवृत्त मुख्याध्यापक सह्याद्री विद्यालय, संजय पाटील माजी नगरसेवक यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

बाबू पुजारी, प्रवीण महाडिक अध्यक्ष, उत्सव कमिटी, सिद्धार्थ गायकवाड, श्रीकांत आठवले आदींनी मेहनत घेतली.

# पॉश कायद्याबाबत जनजागृती

**रायगड : रामप्रहर वृत्त**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अलिबाग येथे २३ एप्रिल रोजी ओलावा सामाजिक संस्था, पेण यांच्या वतीने एक महत्त्वपूर्ण जनजागृतीपर कार्यशाळा झाली.

यावेळी डॉ.भावना भारंबे, डॉ.संतोष हराळकर, डॉ.नाझिया खान, डॉ.संतोष वाघमोडे व डॉ. रुपाली कवितके तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, डॉक्टर आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यशाळेत आरोग्य, सामाजिक जबाबदारी आणि महिलांच्या सुरक्षिततेसंबंधी विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. संस्थेच्या प्रतिनिधींनी समाजात जागरूकता निर्माण करण्यासाठी अशा कार्यशाळांचे महत्त्व अधोरेखित केले. विशेषतः महिलांच्या हक्कांबाबत जागरूकता, कार्यस्थळी सुरक्षित वातावरण आणि सामाजिक संवेदनशीलता यांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन अंतर्गत तक्रार समिती मार्फत अधिष्ठाता डॉ. पूर्वा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

कार्यशाळेदरम्यान नाजूका गुरव, शीतल ठाकूर व ज्योत्सना गावंड यांनी विविध उदाहरणांद्वारे विषय स्पष्ट करत उपस्थितांशी संवाद साधला.

कार्यशाळेचे सूत्रसंचालन समाजसेवा अधीक्षक नम्रता रणसिंग यांनी केले, तर शेवटी समाजसेवा अधीक्षक हर्षा जाधव यांनी उपस्थितांचे आभार मानले आणि भविष्यातही अशा उपक्रमांचे आयोजन करण्याचा संकल्प व्यक्त केला.

# भाविकांचे श्रद्धास्थान चौल येथील शितळामातेचे जागृत देवस्थान

चौल म्हणजे प्राचीन चंपावतीनगरी. प्राचीन काळी चौलमध्ये ३६० मंदिरे असल्याचा उल्लेख सापडतो. त्यामुळे चौलला पौराणिक अन्यय साधारण महत्व असून येथील अनेक मंदिरे जागृत असल्याची महती आहे. संपुर्ण महाराष्ट्रात प्रसिध्दीस असलेले चौलचे शितळामाता मंदिर त्यापैकीच एक आहे. भक्त ांना कौल देणारे जागृत देवस्थान म्हणून शितळामाता मंदिर आजही भाविकांचे श्रध्दास्थान आहे.

चौल या दक्षिणेकडील प्राचीन नगरीत चौलच्या आंबेपुरी पाखडीत हिरव्या गर्द नारळ पोफळीच्या छायेत शितळादेवीचे भव्य मंदिर आहे. अलिबागपासून १८ कि.मी.अंतरावर असलेल्या चौलनाका येथून आग्रावकडे जाणाऱ्या रस्त्यामध्ये शितळामाता मंदिर आहे. चौलनाक्यापासून दीड ते दोन कि.मी. अंतरावर असलेल्या शितळादेवी मंदिरास जाण्यासाठी रिक्षाचा प्रवास करावा लागतो अथवा अलिबाग येथून थेट आग्राव एस.टी.ने शितळादेवीच्य मंदिराकडे जाता येते.



पुर्वीची स्थिती लक्षात घेता हे मंदिर चौलच्या दक्षिण खाडीजवळ बांधले होते. परंतू आता जवळपास खाडी भरून बरीच जमीन वाढली आहे. या देवतेवर आंग्रे घराण्याची या देवतेवर दृढ श्रध्दा होती. आंग्रे काळातच १७५९मध्ये या मंदिराचा जीर्णोध्दार झाल्याचे लिखीत मिळते. या मंदिराचा प्रथम जिर्णोध्दार इ.स.१५८मध्ये बाबूभट उपाध्ये यांनी द्रव्य मिळवून केल्याची नोंद आहे. इ.स.१७६७मध्ये विसावी सरसुभेदार यांनी ब्राम्हण भोजन घातले. १७८५मध्ये एप्रिलच्या सुमारास राघोजी आंग्रे कुटूंबासह देवीच्या दर्शनाला आले होते, तर १७९२च्या ऑक्टोबर महिन्यात मुलाबद्दलचा नवस फेडण्यासाठी आले होते. त्याप्रसंगी हत्ती, घोडे, सरंजाम, व काही लष्कर बरेच दिवस तळ ठोकून या ठिकाणी राहिले होते. १८०५मध्ये बाबूराव आंग्रे दर्शनाला आल्याचा उल्लेख असून दरवर्षी दसऱ्यांच्या दिवशी आंग्रे कुटूंब दर्शनाला न चुकता येई व देवीच्या रक्षकाचा मान देत असत.पुर्वीचे आंग्रे काळीन लाकडी व कौलारू मंदिर आता पाडून त्या वास्तूतील मुर्तीची जागा न बदलता ग्रामस्थांनी जिर्णोध्दार समिती नेमून २७ मार्च १९९० रोजी गुढी पाडव्याच्या मुर्हूतावर नवीन सिमेंट क्रॉकिटचे मंदिर बांधण्यास सुरूवात केली. मार्च १९९७मध्ये रायगडचे तत्कालीन जिल्हाधिकारी रघुनाथ राठोड यांचे हस्ते जिणौध्दाराचे काम पुर्ण झाल्याने उद्धाटन करण्यात आले.

ही देवता महाराष्ट्रात नव्हे तर अन्य प्रांतातील अनेक कुटूंबाची कुलदैवत आहे. रविवार, मंगळवार, गुरूवात व शुक्रवार या दिवशी भाविकांची मोठी गर्दी पहावयास मिळते.तर मंगळवार व शुक्रवार या दिवशी भाविक मनातील इच्छा अथवा अडचणी या विषयी देवीचा कौल मागतात. या मंदिराच्या बाहेर उजव्या हाताव्या हाताला गुलमादेवी, खोकलादेवी व खरूजादेवीच्या मुर्ती आहेत. जर कोणाला गुलमा झाल्या असेल तर तो जाण्यासाठी गुलमादेवीला ओटी भरणे, कोणाला खोकला झाला असेल तो जाण्यासाठी तर खोकलादेवीची औटी भरणे, तर कोणाला खरूज झाली असेल तर ती जाण्यासाठी खरूज देवीची ओटी भरून शितळामातेचा आशिर्वाद मोठया श्रध्दा व भक्तीने भाविक घेतात, तर शितळामातेच्या मंदिराच्या समोरील पुष्करणीतील पाण्याने पाय धुवूनच मंदिरात प्रवेश घेण्याची प्रथा आहे तसेच विविध रोग आदींची सुटका होण्यासाठी या पुष्करणीतील पवित्र पाण्याने आंघोळ करण्याची श्रध्दा भाविक अदयापी ठेवून आहेत. या देवीच्य परिसरात असलेल्या गोळबादेवी व भरडादेवी या शितळामातेच्या उपदेतता असल्याचे सांगितले जाते.

सागर तिरावरील चंपावतीनगरीत देवीची उपासक असलेली सुंदर,सुशील, निर्मळ, उदार, धर्मशील, कोमल, मनाची चंपावती राणीचे राज्य होते. चंपावती नगराला समुद्राचा वेढा होता. समुद्राच्या लाटाने चंपावती नगरीची तटबंदी सारखी तुटून नुकसान होत असे. समुद्राचे पाणी येण्याचे संकट दरवर्षी येत होते. त्यामुळे राणी हतबल होऊन दुखी होई, चांपतवी राणीचा दिवसरात्र प्रजा व राज्य यांच्या चिंतेत जाई, महासागरापुढे काय करावे असा प्रश्न सातत्याने राणीच्या मनात निर्माण होई. बरेच दिवस लोटल्यावर राणीने एकांतात अनुष्ठाण्नास आरंभ केला. मौनव्रत पाळॅन देवीच्या उपासनेला सुरूवात केली असे नवरात्रीचे आठ दिवस गेले. राणीच्या उपासनेला यश आले. शितळामाता प्रत्यक्ष प्रकट होवून राणीला म्हणाली, चंपावती काय संकट आहे, सागारावर माझी सत्ता आहे. मला शितळामाता म्हणतात, त्यावर राणीने सागरापासून होणाऱ्या त्रासाबद्दलची कहानी देवीला कथन केली. या सागराच्या संकटापासून नगरीचे रक्षण कर असे सांगताच देवीने क्षण ही न घालवता माझे शक्तीने सागराला शांत करेन असे म्हणत हातातील तुंबर सागरावर फेकला व सागर अडविला, सागर भयभीत होऊन शितळामातेस शरण आला व यापुढे या नगरीला कोणत्याही प्रकाराचा त्रास होणार नाही असे वचन सागराने देवीला दिले. व शितळामातेस राज्य करण्यासाठी सिंहासनी बसवले. पूजापात्र घेऊन मातेची पुजा करून निर्मळ गंगाजळ, हळद कुंकू, आभुषणे, कनक, वस्त्र, श्रीफळ अर्पण केले. त्यापासून देवीचे स्थान या चंपावतीनगरीत निर्माण झाले. शितळादेवीचा दरबार देवदेवतेचे माहेरघर आहे. देवदेवता दर्शनासाठी येऊ लागल्या अशी पौराणिक कथासार आख्यायिका सांगितली जाते.

चौलचे शितळामातेचे जागृत देवस्थानास मुबई, पुणे, ठाणे तसेच रायगड जिल्हातून असंख्य भाविक नित्याने भेट देत असतात.

**-महेंद्र खैरे, रेवदंडा**

# कोलकाताचा लखनऊवर ‘सुपर’ विजय

**लखनऊ : वृत्तसंस्था**

कोलकाता नाईट रायडर्सने आयपीएलमध्ये रविवारी लखनऊ सुपर जायंट्सवर सुपर ओव्हरमध्ये विजय मिळवला. त्याआधी अखेरच्या चेंडूवर लखनऊला विजयासाठी सात धावांची गरज असताना मोहम्मद शमीने षटकार खेचला आणि सामना बरोबरीत आणला. यासह सुपर ओव्हर खेळवण्यात आली.

केकेआरच्या या सामन्याचे हिरो ठरले रिंकू सिंह व सुनील नरेन. रिंकूने या सामन्यात ८१ धावांची खेळी करत क्षेत्ररक्षण करताना सहा झेल टिपले, तर सुनीलने सुपर ओव्हरमध्ये पहिल्या तीन चेंडूत विकेट्स घेतल्याने संघाला फक्त दोन धावांचे विजयासाठी आव्हान मिळाले.

सुपर ओव्हरसाठी लखनऊकडून एडन मारक्रम व निकोलस पुरनची जोडी मैदानात आली, तर केकेआरकडून सुनील नरेन गोलंदाजीसाठी आला. पुरनला नरेनने पहिल्याच चेंडूवर क्लीन बोल्ड केले. त्यानंतर ऋषभ पंत फलंदाजीला आला. त्याने एक धाव घेतली. त्यानंतर मारक्रम तिसऱ्या चेंडूवर स्ट्राईकवर आला आणि तो मोठा फटका खेळण्याच्या प्रयत्नात झेलबाद झाला. यासह दोन विकेट्स गमावल्याने केकेआरला विजयासाठी दोन धावांची गरज आहे.

केकेआरकडून धावांचा पाठलाग करण्यासाठी रिंकू व पॉवेल ही जोडी



मैदानावर उतरली, तर लखनऊकडून गोलंदाजीसाठी प्रिन्स यादव आला. केकेआरला विजयासाठी दोन धावांची गरज होती. प्रिन्सच्या पहिल्या चेंडूवर रिंकूने चौकार लगावत संघाला सहज विजय मिळवून दिला.

तत्पूर्वी लखनऊला अखेरच्या षटकात विजयासाठी १७ धावांची गरज होती. कार्तिक त्यागीकडे गोलंदाजीची संधी दिली. त्याने पहिल्या चेंडूवर एक धाव दिली, तर दुसरा चेंडू नो बॉल टाकला. त्यानंतर फ्री हिटचा चेंडूदेखील कार्तिकने नो टाकला. मग लीगल दुसऱ्या चेंडूवर हिम्मत सिंगने एक चौकार मारला. तिसऱ्या चेंडूवर हिम्मत झेलबाद झाला. चौथ्या चेंडूवर एक धाव, तर पाचवा चेंडू निर्धाव राहिला. यानंतर शमीने अखेरच्या चेंडूवर षटकार लगावत सामना बरोबरीत आणला. त्यामुळे सामन्याचा मोर्चा सुपर ओव्हरपर्यंत पोहचला होता.

केकेआरने दिलेल्या १५६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना लखनऊची सुरुवात फारशी चांगली झाली नाही. केकेआरकडून वरूण चक्रवर्ती व वैभव अरोरा यांनी प्रत्येकी दोन, तर अनुकूल रॉय, कॅमरून ग्रीन व सुनील नरेन यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

लखनऊने नाणेफेक जिंकत केकेआरला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले होते. केकेआरची सुरुवात पुन्हा खराब झाली. रिंकूने ५१ चेंडूत सात चौकार व पाच षटकारांसह ८३ धावांची खेळी केली. त्याने अखेरच्या षटकात सलग चार षटकार खेचत आपल्या संघाला १५५ धावांपर्यंत पोहचवले.

## नवी मुंबईत आयबीए ग्लोबल बॉक्सिंग सिरीज

### पद्मविभूषण मेरी कोम यांची उपस्थिती, खेळाडूंना मार्गदर्शन

**नवी मुंबई : बातमीदार**



मरिन बॉक्सिंग अकॅडमीच्या वतीने आणि नवी मुंबई महापालिकेच्या सहयोगाने नेरूळ येथील नेक्सस सी वूड मॉलमध्ये आयबीए ग्लोबल बॉक्सिंग सिरीज या आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ऑलिम्पिक पदक विजेत्या सुप्रसिद्ध भारतीय बॉक्सर मेरी कोम आणि नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

या स्पर्धेदरम्यान बोलताना पद्मविभूषण मेरी कोम म्हणाल्या की, कोणत्याही क्षेत्रात योग्य रितीने मेहनत केल्याशिवाय यश मिळत नाही. सातत्याने सराव, नवनवीन गोष्टी शिकण्याची इच्छा, जिद्द आणि चिकाटी हे अत्यंत महत्त्वाचे गुण असून एका यशाने समाधानी न होता व एका अपयशाने खचून न जाता सतत खेळत राहणे हाच यशाचा खरा मंत्र आहे.

नवी मुंबई महापालिकेच्या वतीने विविध खेळांना चांगले व्यासपीठ उपलब्ध करून देऊन खेळांडूमध्ये प्रेरणा निर्माण करण्याचे काम केले जात असल्याचे सांगत महापौर सुजाता पाटील यांनी, मेरी कोमसारख्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकित बॉक्सिंग चॅम्पियन या स्पर्धेच्या निमित्ताने नवी मुंबईत आल्याने या स्पर्धेची उंची वाढल्याचे सांगितले. यापुढील काळात सर्वच खेळांसाठी पायभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कटिबध्द राहून प्रयत्न करण्यात येतील, असे त्या म्हणाल्या.

या स्पर्धेस नवी मुंबई महापालिकेच्या क्रीडा, सांस्कृतिक व युवक कल्याण समितीचे सभापती गिरीश म्हात्रे, क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव, क्रीडापटू हितेश चौधरी, मरिन बॉक्सिंग अकॅडमीचे प्रमुख देवराज दास आदी उपस्थित होते.

## माणगावचा ललित कदम महाराष्ट्र महा स्विम चॅम्पियनशिपचा मानकरी

**माणगाव : बातमीदार**

शिवछत्रपती क्रीडा प्रबोधिनी बालेवाडी, पुणे येथे महाराष्ट्रातील जलतरणपटूंसाठी राज्यस्तरीय महा स्विम चॅम्पियनशिप आयोजित करण्यात आली होती. या जलतरण स्पर्धेसाठी राज्यभरातून विविध वयोगटातील स्पर्धकांनी सहभाग घेतला. त्यात जे.एम. राठी विद्यालय रोहा येथील विद्यार्थी आणि माणगावचा सुपुत्र ललित सखाराम कदम याने चार सुवर्ण व एक रौप्यपदक जिंकत संबंधित वयोगटातील चॅम्पियनशिपदेखील मिळवली.

ललितला मुख्य प्रशिक्षक भूषण शिर्के, भूषण म्हात्रे तसेच विशेष मार्गदर्शक निखिल शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. सद्यस्थितीत ललित हा रोहा येथील जे.एम. राठी विद्यालयातील जलतरण तलावात नियमितपणे सराव करीत असून त्याला संबंधित विद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य तसेच ट्रस्टी यांचे सहकार्य व प्रोत्साहन मिळत असते. ताज्या यशाबद्दल त्याचे अभिनंदन होत आहे.

## आरडीसीए आयोजित १४ वर्षाखालील मुलांच्या क्रिकेट स्पर्धेला प्रारंभ

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन (आरडीसीए)च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या १४ वर्षाखालील मुलांच्या एकदिवसीय निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेला जिल्ह्यातील विविध मैदानांवर प्रारंभ झाला आहे.



रायगड जिल्ह्यातील एकूण ३२ अकॅडमी आणि क्लबच्या संघांनी या स्पर्धेत सहभाग घेतला असून स्पर्धा प्रथम साखळी व त्यानंतर बाद फेरीनुसार होणार आहे. जिल्ह्यातील छत्रपती शिवाजी महाराज मैदान पेण, चिचकर मैदान महाड, फोर्टी प्लस गावदेवी मैदान टेंभोडे पनवेल, जय हनुमान क्रीडांगण जुई कामोठे, छत्रपती शिवाजी महाराज मैदान शिवाजीनगर गव्हाण, भैरवनाथ क्रिकेट ग्राउंड विचुंबे या मैदानांवर संपूर्ण स्पर्धा आयोजित केली जाणार आहे.

स्पर्धेसाठी जिल्ह्यातील पंच व गुणलेखक सामानाधिकारी म्हणून काम करणार आहेत. स्पर्धेत उत्तम कामगिरी करणाऱ्या खेळाडूंची निवड रायगडच्या संघात केली जाणार असून पुढे हा संघ महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित केल्या जाणाऱ्या आंतरजिल्हा क्रिकेट स्पर्धेत भाग घेणार आहे.

आरडीसीएच्या वतीने विविध वयोगटात क्रिकेट स्पर्धेचे व कॅम्पचे आयोजन सातत्याने होत असून जिल्ह्यातील युवा क्रिकेटपटूंना चांगल्या दर्जाचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील व सचिव प्रदीप नाईक यांनी सांगितले.

## डेव्हिड, शेफर्डचे चाहत्यांसोबत गल्ली क्रिकेट

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दिल्ली कॅपिटल्सविरुद्धच्या सामन्याआधी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचे दोन स्टार खेळाडू टिम डेव्हिड आणि रोमारियो शेफर्ड यांनी दिल्लीत चाहत्यांसोबत चक्क गल्ली क्रिकेटचा आनंद लुटला. सामन्यापूर्वी अशा प्रकारे चाहत्यांसोबत वेळ घालवून या परदेशी खेळाडूंनी स्वतःवरील दडपण हलके केल्याचे दिसून आले. या दोघांचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे.






## अखिल भारतीय पुरुष व्यावसायिक गट कबड्डी स्पर्धा आजपासून



**मुंबई : प्रतिनिधी**

बंड्या मारूती सेवा मंडळाने आपल्या अमृत महोत्सवी वर्ष आणि हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून अखिल भारतीय पुरुष व्यावसायिक गट कबड्डी स्पर्धेचे आयोजन केले आहे. मुंबईतील ना.म. जोशी मार्ग येथील श्रमिक जिमखाना या ठिकाणी २८ एप्रिल ते २ मे या कालावधीत होणाऱ्या या स्पर्धेत भारतातील नामवंत संघांनी आपला सहभाग नोंदविला आहे.

महाराष्ट्रातील सात बलाढ्य संघ भारताच्या विविध राज्यातून आलेल्या आठ संघाशी चुरशीची लढत देतील. २८ एप्रिल रोजी युवा पलटन (इनशोअरकोट प्रा. लि.)विरुद्ध मिडलाईन अकॅडमी या सामन्याने या कबड्डीच्या महासंग्रामाला सुरुवात होईल. मॅटच्या एका क्रीडागणावर सायंकाळच्या सत्रात प्रखर विद्युत झोतात हे सामने खेळविले जातील. या स्पर्धेत १२ लाख १२ हजार रुपयांची रोख रक्कम बक्षिसादाखल वाटण्यात येईल.

स्पर्धेत विजयी होणाऱ्या संघास पाच लाख व आकर्षक चषक, तर उपविजेत्या संघास तीन लाख व आकर्षक चषक प्रदान करण्यात येईल. उपांत्य उपविजयी दोन्ही संघांना प्रत्येकी ५० हजार व चषक प्रदान करण्यात येईल. स्पर्धेत सर्वोत्तम ठरणाऱ्या खेळाडूस एक लाख, तर स्पर्धेतील उत्कृष्ट चढाई व पकडीच्या खेळाडूस प्रत्येकी ५० हजार देऊन गौरविण्यात येईल. प्रत्येक सामन्यात उत्तम खेळ करणाऱ्या खेळाडूस पाच हजार देऊन सन्मानित करण्यात येईल.

### संघांची गटवारी

- अ गट : युवा पलटन (इनशोअरकोट प्रा. लि.), ओएनजीसी, मिडलाईन अकॅडमी.
- ब गट : भारत पेट्रोलियम, दक्षिण मध्य रेल्वे, मुंबई पोस्टल.
- क गट : भारतीय नौदल, मुंबई बंदर, तामील थलाईवास.
- डगट : रेडआर्मी, युनियनबँक, जयपूर पिंकक्लब.
- ई गट : तामिळनाडू स्टेट, युपी योद्धा, डीपीयु पुणे









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com